मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : १०३ ■ रविवार, २१ डिसेंबर २०२५ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




## () थोडक्यात ()

### आसाममध्ये राजधानी एक्सप्रेसची हत्तींच्या कळपाला धडक; ७ हत्तींचा मृत्यू, ट्रेनचे पाच डबे घसरले




**दैनिक युवक आधार**
**आसाम :** सैरांग- नवी दिल्ली राजधानी एक्सप्रेसची धडक बसल्याने आसामच्या होजाई जिल्ह्यात शनिवारी (दि. २०) पहाटे हत्तींच्या कळपातील ७ हत्ती ठार झाले असून १ हत्ती गंभीर जखमी झाला आहे. या अपघातात ट्रेनचे पाच डबे आणि इंजिन रुळावरून घसरले. मात्र, सुदैवाने या दुर्घटनेत कोणत्याही प्रवाशाला दुखापत झाली नसल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.ही घटना शनिवारी पहाटे सुमारे २.१७ वाजता होजाई जिल्ह्यातील छंगजुराई गावाजवळ घडली. सुरुवातीला आठही हत्ती मृत्युमुखी पडल्याचे सांगण्यात आले होते; मात्र नंतर त्यापैकी एक हत्ती जिवंत आढळून आल्याने त्याच्यावर उपचार सुरू असल्याचे स्पष्ट झाले. 'द हिंदू'च्या वृत्तानुसार नागाव विभागाचे वन अधिकारी सुहास कदम यांनी या घटनेबद्दल माहिती देताना सांगितले की, परिसरात दाट धुके असल्याने हा अपघात घडला असावा, असा प्राथमिक अंदाज आहे. "मृत्यूमुखी पडलेल्या सातही हत्तींचे शवविच्छेदन सुरू आहे. जखमी हत्तीवर स्थानिक पशुवैद्यकीय डॉक्टरांकडून उपचार करण्यात येत आहेत. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून अपघात स्थळाजवळच अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत," असे त्यांनी सांगितले.

# विज्ञान व नवोन्मेषातून मानवकल्याणाचा संदेश देणारे डॉ. माशेलकर यांचे कार्य प्रेरणादायी – उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील

**डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या 'More from Less for More' पुस्तकाचे मुंबईत प्रकाशन**

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, प्रतिनिधी :**
विज्ञान, शिक्षण आणि नवोन्मेषाच्या माध्यमातून समाजातील विषमता दूर करून मानव कल्याणाचा जागतिक संदेश देणारे पद्मविभूषण डॉ. रघुनाथ अनंत माशेलकर यांचे कार्य तरुण पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले.

आंतरराष्ट्रीय मानवी एकात्मता दिनाचे औचित्य साधून इटरनल कॉर्पोरेट मीडिया प्रा. लि. व Inspiring India यांच्या संयुक्त विद्यमाने ताजमहाल पॅलेस, कुलाबा, मुंबई येथे आयोजित ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर व सुशिल बोर्डे यांच्या "More from Less for More : Innovation's Holy Grail" या पुस्तकाचे प्रकाशन मंत्री चंद्रकांतदादा पाटील व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.




यावेळी इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (ICT) चे एमेरिटस प्राध्यापक पद्मविभूषण प्रा. डॉ. एम. एम. शर्मा, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मुकेश डी. अंबानी, बजाज ऑटो लिमिटेडचे अध्यक्ष निरज बजाज, गोडरेज इंडस्ट्रीज ग्रुपचे चेअरमन व एम.डी. नादिर गोदरेज, मॅरिको लिमिटेडचे अध्यक्ष हर्ष मरिवाला, काइनेटिक ग्रीन एनर्जी अँड पॉवर सोल्युशन्सच्या संस्थापक व सीईओ सुलज्जा मोटवानी, इटरनल कॉर्पोरेट मीडिया प्रा. लि.चे चेअरमन कृपाशंकर तिवारी तसेच एमडी व सीईओ अलोक तिवारी यांच्यासह उद्योग, शिक्षण व संशोधन क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले की, देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवीन शैक्षणिक धोरणाची संकल्पना मांडल्यानंतर ती प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी डॉ. माशेलकर यांचे मोलाचे योगदान लाभले आहे. उच्च आणि तंत्रशिक्षण क्षेत्रातील अनेक बदल, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, आर्टिफिशियल इंटेलिजन्स या क्षेत्रातील राज्याच्या धोरणाबाबतही केलेल्या मार्गदर्शनामुळे नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र राज्य आज देशात अग्रस्थानी असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ. माशेलकर यांनी मिळविलेल्या 54 डॉक्टरेट पदव्या हा देशातील अभूतपूर्व विक्रम असून साध्या पार्श्वभूमीतून जागतिक दर्जाचे वैज्ञानिक नेतृत्व उभे करणारा त्यांचा जीवनप्रवास युवकांसाठी दिशादर्शक असल्याचे श्री. पाटील म्हणाले. जागतिक स्तरावर सर्वोत्कृष्ट वैज्ञानिक म्हणून ओळख असलेल्या डॉ. माशेलकर यांचा हा प्रेरणादायी प्रवास असाच सुरू राहीला, तर भविष्यात त्यांना नोबेल पारितोषिक व भारतरत्न पुरस्काराने सन्मान होईल अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

आंतरराष्ट्रीय मानवी एकात्मता दिनाच्या संदर्भात बोलताना मंत्री श्री. पाटील म्हणाले की, राष्ट्रनिर्मितीसाठी एकात्मता, समावेशिता आणि सामूहिक जबाबदारी अत्यंत महत्त्वाची आहे.

# दिल्लीत प्रदूषण रोखण्यासाठी 'वर्क फ्रॉम होम' ते 'पीयूसी' सक्ती

**दैनिक युवक आधार**
**नवी दिल्ली, प्रतिनिधी :**
दिल्लीत वायू प्रदूषणाची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. वायू प्रदूषण रोखण्यासाठी दिल्लीत गुरुवारपासून काही नियम लागू करण्यात आले आहेत. दिल्लीत अवजड वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांना 'वर्क फ्रॉम होम' देणे सक्तीचे करण्यात आले आहे. तसेच बीएस-६ वाहनांनाच दिल्लीच्या रस्त्यावर धावण्याची परवानगी देण्यात आली आहे. हे बदल गुरुवारपासून लागू झाले आहेत.




१३ डिसेंबर पासून सलग तीन दिवस दिल्लीतील हवा 'गंभीर' श्रेणीत होती. त्यामुळे दिल्लीतील वायू प्रदूषण रोखण्यासाठी दिल्ली सरकारने तातडीने काही उपाययोजना केल्या आहेत.

हवा गुणवत्ता व्यवस्थापन आयोगाने वायू प्रदूषण रोखण्यासाठी ग्रॅप-४ची घोषणा केली होती. त्याअंतर्गत अवजड वाहनांना दिल्लीत प्रवेश बंदी करण्यात आली आहे. तसेच बीएस-६ वाहनांनाच दिल्लीत प्रवेश दिला जाणार आहे.

दिल्लीचे कामगारमंत्री कपिल मिश्रा यांनी दिल्लीतील कर्मचाऱ्यांना वर्क फ्रॉम होम देण्याचे आवाहन केले आहे. सगळ्या खासगी तसेच सरकारी संस्थांना याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

निम्म्या कर्मचाऱ्यांना वर्क फ्रॉम होम न दिल्यास कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा मिश्रा यांनी दिला. दरम्यान, अत्यावश्यक सेवा तसेच आरोग्य सेवेतील कर्मचाऱ्यांना वर्क फ्रॉम होम दिले जाणार नसल्याचे सांगण्यात आले.

वायू प्रदूषण रोखण्यासाठी दिल्लीतील बांधकामे थांबवण्यात आली आहेत. बांधकामे थांबवल्याने परिणाम होणाऱ्या मजुरांना तसेच कर्मचाऱ्यांना १० हजार रूपये नुकसान भरपाई सरकारकडून दिली जाणार आहे.

# बुटीबोरी एमआयडीसीत मोठा अपघात; पाण्याची टाकी फुटल्यानं सहा कामगारांचा मृत्यू, अनेक कामगार जखमी

**दैनिक युवक आधार**
**नागपूर, प्रतिनिधी :**
नागपूरच्या बुटीबोरी एमआयडीसी परिसरातील आवाडा कंपनीत मोठा अपघात झाल्याची घटना घडली आहे. या कंपनीच्या आवारात बांधकाम सुरू असलेली पाण्याची टाकी अचानक फुटल्यानं हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती पुढं येत आहे. या अपघातात सहा कामगारांचा मृत्यू झाला आहे, तर अनेक कामगार गंभीर जखमी झालेत. त्यांना बुटीबोरी येथील एका खासगी रुग्णालयात दाखल केलं आहे. हा अपघात नेमका कसा झाला याबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही. ज्यावेळी ही घटना घडली त्यावेळी १५ ते २० कामगार हे त्या ठिकाणी काम करत होते.



**अनेकांचा शोध सुरू :** हा अपघात नेमका कशामुळे झाला? याबाबतची अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही. बुटीबोरी पोलीस ठाण्याचे अधिकारी, कर्मचारी घटनास्थळी दाखल झालेत. सर्वात आधी सर्वच जखमींना उपचारासाठी रुग्णालयामध्ये दाखल केलं असून कुणी ढिगाऱ्याखाली तर दबलेलं नाही ना? याची खातरजमा केली जात आहे.

**पाण्याच्या दाब सहन न झाल्यानं टाकी फुटली :** मागच्यावर्षी ऑक्टोबर महिन्यात या कंपनीच्या निर्माणकार्यास सुरवात झाली होती. रिन्युएबल एनर्जीच्या क्षेत्रात ही कंपनी कार्यरत आहे. या प्लाँटमध्ये सोलर पॅनलची निर्मिती केली जाणार आहे. कंपनीत लागणारे पाणी साठवण्यासाठी चार टाक्या तयार केल्यात. त्यामध्ये पाणीसुद्धा भरलं होतं. मात्र, पाण्याचा दाब सहन न झाल्यामुळं त्यापैकी पाण्याची एक टाकी अचानक फुटली. यावेळी टाकीमध्ये असलेलं लाखो लिटर पाणी मोठ्या प्रवाहानं बाहेर आलं. यावेळी तिथं काम करत असलेले १० ते १५ कामगार त्यात अडकले. यात सहा कामगारांचा मृत्यू झाला आहे.

**टाकीच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह :** ज्या टाकीमध्ये लाखो लिटर पाण्याची साठवणूक केली जात होती. त्या टाकीच्या गुणवत्तेवर प्रश्न चिन्ह उपस्थित केलं जात आहे. त्या टाकीची क्षमता नसताना मोठ्या प्रमाणात पाणी का साठवलं? यासह अनेक प्रश्नांची उत्तरं कंपनी व्यवस्थापनाला द्यावी लागणार आहेत.

**कंपनीचं मोठं नुकसान :** पाण्याच्या टाकीशेजारीही बांधकाम सुरू होतं. ज्यावेळी पाण्याची टाकी फुटली. त्यावेळी तिथं काम करणारे कामगार काही अंतरावर फेकले गेले. तसंच तिथं असणार साहित्यसुद्धा काही दूरपर्यंत वाहून गेलं. त्यामुळं कंपनीचं मोठं नुकसान झालं आहे.

**अपघाताचा तपास सुरू :** या घटनेची माहिती समजताच नागपूर (ग्रामीण) पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी घटनास्थळी धाव घेतली.

# दृष्टिबाधित खेळाडूंना राज्य सरकारकडून सर्वतोपरी मदत करण्यात येणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**■ दृष्टिबाधित टी-२० क्रिकेट विश्वविजेत्या महिला संघातील खेळाडूंचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरव**

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, प्रतिनिधी :**
भारताच्या दृष्टिबाधित महिला टी-२० क्रिकेट संघाने जागतिक पातळीवर ऐतिहासिक कामगिरी करत अजिंक्यपद पटकावल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टीममधील खेळाडूंचा सत्कार केला. महिला खेळाडूंना त्यांच्या सरावात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी व त्यांना आर्थिक सहाय्य, रोजगाराच्या संधी आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी मदत करेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



मुख्यमंत्री यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी झालेल्या या कार्यक्रमात विश्वविजेत्या संघातील खेळांडूचा सत्कार करण्यात आला. यावेळी क्रीडा व युवक कल्याण आयुक्त शीतल तेली उगले, संघाच्या कर्णधार दीपिका टी.सी., उपकर्णधार व महाराष्ट्राची खेळाडू गंगा कदम, क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाईंड इन इंडियाचे चेअरमन के. जी. महंतेश, क्रीडा विभागाचे उपसचिव सुनील पांढरे, जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के यांच्यासह संघातील खेळाडू उपस्थित होते.

या खेळाडूंनी भारताचे नाव जागतिक पातळीवर उज्ज्वल केले असून तिरंग्याचा सन्मान वाढवला आहे, असे गौरवोद्गार काढून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, संपूर्ण स्पर्धेत भारतीय संघ अपराजित राहिला. अंतिम सामन्यात निर्णायक विजय मिळवत भारतीय मुलींनी दृष्टिबाधित क्रिकेटमधील आपले वर्चस्व सिद्ध केले. या विजयामुळे देशभर आनंदाचे वातावरण असून इतिहासात दृष्टिबाधित महिला टी-२० क्रिकेटचे पहिले चॅम्पियन म्हणून भारताचे नाव कोरले गेले आहे. इतिहासात या विजयाची नोंद होईल. या यशामागे खेळाडूंनी घेतलेले अपार कष्ट, सातत्यपूर्ण सराव आणि अनेक अडचणींवर मात करण्याची जिद्द आहे. प्रत्येक खेळाडूची स्वतःची संघर्षकथा असून प्रतिकूल परिस्थितीतही हार न मानता त्यांनी सराव सुरू ठेवला. "कोशिश करने वालों की कभी हार नहीं होती" हे वाक्य या संघाने प्रत्यक्षात उतरवले आहे.संघाच्या वतीने मांडण्यात आलेल्या अडचणी लक्षात घेऊन राज्य सरकार सर्वतोपरी मदत करेल.

तसेच खेळाडूंना सरावासाठी स्वतंत्र आणि कायमस्वरूपी मैदान व इतर सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत क्रीडा आयुक्तांमार्फत चर्चा करून योग्य कार्यवाही केली जाईल. कोणतीही आर्थिक किंवा कौटुंबिक अडचण खेळातील प्रगतीस अडथळा ठरू नये, यासाठी लागेल ती मदत करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# सामानाच्या वजनाची मर्यादा ओलांडल्यास आता रेल्वेही शुल्क आकारणार

**दैनिक युवक आधार**
**नवी दिल्ली, प्रतिनिधी :**
रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांनाही आता विमानाप्रमाणेच मर्यादित वजनापेक्षा अधिकचे साहित्य नेल्यास त्याचे शुल्क भरावे लागणार असल्याचे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत स्पष्ट केले.

विमान प्रवास करण्यापूर्वी तुम्ही नेत असलेल्या साहित्याचे वजन तपासले जाते. मर्यादेपक्षा जास्त वजन असल्यास त्यावर वाढीव शुल्क आकारले जाते. परंतु आता रेल्वेने प्रवास करतानाही ही काळजी घ्यावी लागणार आहे. खासदार वेमिरेड्डी प्रभाकर रेड्डी यांच्या प्रश्नाला त्यांनी उत्तर दिले. ज्यात विमान प्रवासासारखे रेल्वे प्रवास करतानाही प्रवाशांसाठी बॅगच्या वजनाचा नियम लागू केला आहे का, असा प्रश्न विचारण्यात आला होता.

अश्विनी वैष्णव म्हणाले की, सध्या विविध श्रेणीनुसार प्रवाशांकडून ट्रेनमधून घेऊन जाणाऱ्या साहित्यावर कमाल वजन निश्चित केले आहे. प्रत्येक श्रेणीत मोफत सामान आणि कमाल मर्यादा ठरवण्यात आली आहे. सेकंड क्लासमधून प्रवास करणाऱ्यांसाठी ३५ किलोपर्यंत सामान मोफत नेता येईल. त्यानंतर ७० किलोपर्यंत सामानावर शुल्क आकारले जातील. स्लीपर क्लासच्या प्रवाशांसाठी ४० किलो मोफत सामान नेण्याची परवानगी आहे. त्यावर ८० किलोपर्यंत सामानावर शुल्क आकारले जाणार आहे.एसी थ्री टियर आणि चेअर कारच्या प्रवाशांसाठी ४० किलोपर्यंत सामान मोफत नेण्याची परवानगी आहे. फर्स्ट क्लास आणि एसी टू टियरमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना ५० किलोपर्यंत सामान नेता येईल. त्यांना १०० किलोपर्यंत सामान नेण्याची परवानगी आहे. अतिरिक्त सामानावर शुल्क आकारले जाणार आहे. मोफत मर्यादेपेक्षा अधिकचे सामान कोचमधून घेऊन जात असाल तर त्यासाठी निर्धारित दरापेक्षा दीड पट जास्त शुल्क भरावे लागेल असेही रेल्वेमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, प्रवाशांना डब्यांमध्ये वैयक्तिक सामान म्हणून १०० सेमी x ६० सेमी x २५ सेमी (लांबी x रुंदी x उंची) पर्यंतच्या ट्रंक, सुटकेस आणि बॉक्स नेण्याची परवानगी आहे. यापैकी कोणत्याही आकारापेक्षा जास्त सामान कोचमध्ये ठेवण्याची परवानगी नाही, असेही वैष्णव यांनी सांगितले.



# केज तालुक्यातील ग्रामीण भागात शेतकरी बांधवांनी वेळा अमावस्या उत्साहात केली साजरी

**दैनिक युवक आधार**

**केज/प्रतिनिधी :** भारत वर्षातील मराठी मार्गशीर्ष महिन्यातयेणारी अमावस्या म्हणजेच वेळा अमावस्या केज तालुक्या सह ग्रामीण परिसरातील शेतकरी बांधवांनी मोठ्या श्रद्धा, आनंद आणि उत्साहात साजरी केली. अमावस्येला साधारणतः भीतीचे स्थान असले तरी दिवाळी अमावस्या आणि वेळा अमावस्या या आनंद दायी सणांपैकी मानल्या जातात. महाराष्ट्रातील समृद्ध सणपरंपरेतील हा एक वेगळा आणि आगळावेगळा सण असून लातूर, धाराशिव, बीड व सोलापूर जिल्ह्यांच्या कांही भागात विशेषत्वाने साजरा केला जातो.

वेळा अमावस्या हा सण मुळात कर्नाटक राज्यातून सीमावर्ती भागात आला असून आज तो या भागातील शेतकरी संस्कृतीचा अविभाज्य भाग बनला आहे. या दिवशी काळ्या आईची म्हणजेच धरणीमातेची पूजा करून तिच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते. धान्य देणाऱ्या, पालन पोषण करणाऱ्या मातृ भूमीचेउपकार स्मरण्याचा हा दिवस मानला जातो.

या दिवशी गावांमध्ये जणू अघोषित संचारबंदीच असते. सकाळ पासून संध्याकाळ पर्यंत शेत शिवार गर्दीने फुलून गेलेले दिसतात. प्रत्येक शेतात घरातील सदस्य, पाहुणे, नातेवाईक व मित्रमंडळी एकत्र येतात. या काळात ज्वारीसारखी मुख्य पिके कणसात येण्याच्या अवस्थेत असतात. त्यामुळे 'लक्ष्मी गर्भवती आहे' अशी भावना मानून तिच्या डोहाळे जेवणाचा हा सोहळा साजरा केला जातो.थंडीच्या दिवसांना अनुरूप असा वेळा अमावस्येचा खास मेनू असतो. शेतात उपलब्ध असलेल्या विविध भाज्या एकत्र करून भाजी तयार केली जाते. बाजरीच्या भाकरी, गूळ घालून गव्हाची खीर, तसेच ज्वारीच्या पिठाची रात्रभर ताकात मुरवून केलेली आंबील हे या दिवसाचे प्रमुख पदार्थ असतात. या सर्व पदार्थांचा आधी धरणीमातेच्या पूजेसाठी नैवेद्य दाखवला जातो. या दिवशी आंबील हा सर्वाधिक आवडीचा पदार्थ असून मोठ्या प्रमाणावर सेवन केला जातो. शेतात कडब्याची खोप बांधून पाच पांडव व इतर देवतांची पूजा केली जाते.

पूजेनंतर सर्वजण एकत्र बसून जेवणाचा आनंद घेतात. विशेष म्हणजे ज्यांच्याकडे स्वतःचे शेत नाही, त्यांनाही इतरांच्या शेतात आग्रहाने आमंत्रित केले जाते. संध्याकाळ पर्यंत शेतातच मुक्काम करून, सूर्यास्तानंतर शेतकरी बांधव परतीच्या वाटेला लागतात. एक दिवस पूर्णपणे काळ्या आईच्या सान्निध्यात घालवण्याचा हा सण असून, पुढील वर्षीही वेळा अमावस्या पुन्हा साजरी करण्याची आतुरता प्रत्येकाच्या मनात दिसून येते.

# राष्ट्र संत गाडगेबाबांच्या पुण्यतिथीनिमीत्ताने माणुसकी वृध्द आश्रमात अभिवादन




**दैनिक युवक आधार**

**मराठवाडा प्रतिनिधी/श्री. रमेश सुरशे :** राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्ताने माणुसकी समुहाच्या वतीने सु-लक्ष्मी सेवाभावी संस्थेच्या वतीने चालु असलेल्या माणुसकी वृध्दाश्रमात गाडगेबाबाना विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी गाडगेबाबांच्या प्रतीमेचे पुजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.समाजसेवक सुमित पंडित व पुजा पंडित यांनी गाडगेबाबांची प्रेरणा घेवून समाजसेवेला सुरवात केली आहे.राष्ट्र संत गाडगे बाबांचे प्रेरणादाई विचार अडाणी राहू नका,मुला-बाळांना शिकवा,जो वेळेवर विजय मिळवतो तो जगावरही विजय मिळवतो,दगड धोंड्यांची पूजा करण्यात वेळ आणि शक्ती वाया घालवू नका,दान घेण्यासाठी हात पसरू नका,दान देण्यासाठी हात पसरा,दु:खाचे डोंगर चढल्याशिवाय सुखाचे किरण दिसत नाही,धर्माच्या नावाखाली कोंबड्या बकऱ्या सारखे मुके प्राणी बळी देवू नका,माणसाचे खरोखर देव कोण असतील तर ते आई बाप,माणसाने माणसाबरोबर माणसासारखे वागावे हाच बोध मी ग्रहण केला आहे,शिक्षणाने माणसाचे जीवन फुलते आपण ह्या जगात कशासाठी आलोत हे कळते,शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे.

गाडगेबांबाच्या पुण्यतिथी निमित्ताने माणुसकी वृध्द सेवालय येथे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.अभिवादन कार्यक्रमासाठि उपस्थितांना श्रीमती पुजा पंडित यांनी गाडगेबाबा यांचे विचार सांगितले यावेळी उपस्थित माणुसकी समुहाचे समाजसेवक सुमित पंडित,विजय निंबाळकर,राम पंडित,सौ पूजा पंडित,व माणुसकी वृध्दाश्रमातील वृध्द आदी उपस्थित होते.

देव देवळात नाही, माणसात शोधा

गाडगे महाराज हे गोरगरीब, दिनदलित यांच्यामधील अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता यांचे उच्चाटन करण्यासाठी कार्य करणारे समाजसुधारक होते. 'तीर्थी धोंडापाणी देव रोकडा सज्जनी ।' असे सांगत दीन, दुबळे, अनाथ, अपंगांची सेवा करणारे थोर संत म्हणजे गाडगेबाबा 'देवळात जाऊ नका, मूर्तिपूजा करू नका, सावकाराचे कर्ज काढू नका, अडाणी राहू नका, पोथी-पुराणे, मंत्र-तंत्र, देवदेवस्की, चमत्कार असल्या गोष्टींवर विश्वास ठेवू नका', अशी शिकवण आयुष्यभर त्यांनी लोकांना दिली. माणसात देव शोधणाऱ्या या संताने लोकांनी दिलेल्या देणग्यांतील पैशांतून रंजल्या-गांजल्या, अनाथ लोकांसाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी धर्मशाळा, अनाथालये, आश्रम, व विद्यालये सुरू केली. रंजले-गांजले, दीन-दुबळे, अपंग-अनाथ हेच त्यांचे देव. या देवांतच गाडगेबाबा अधिक रमत असत. गाडगेबाबांचे विचार घेऊन आम्ही रंजल्या गांजलेल्या ची माणुसकी च्या माध्यमातून सेवा करतोय.

समाजसेवक, सुमित पंडित

# जकीय पक्षांनी निवडणूक आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करावे – मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांचे आवाहन

## ना हरकत प्रमाणपत्रांसाठी मनपा मुख्यालयात एक खिडकी व्यवस्था

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर :** नागपूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकी दरम्यान सर्व राजकीय पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या आदर्श निवडणूक आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी केले.




निवडणूक आचारसंहितेच्या संदर्भात शहरातील राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींशी चर्चा केली. यावेळी मुख्य वित्त व लेखा अधिकारी श्री. सदाशिव शेळके, उपायुक्त श्री. निर्भय जैन , उपायुक्त श्री. मिलिंद मेश्राम, सहाय्यक आयुक्त श्री. श्याम कापसे प्रामुख्याने उपस्थित होते.

निवडणुकीसाठी उमेदवारांना अडचण जाणार नाही, याची काळजी घेतली जात असून, सर्व झोन कार्यालयांमध्ये निवडणूक अधिकारी राहणार आहेत. तसेच उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी उमेदवारांना आवश्यक ना हरकत पत्रे घेणे सोईचे व्हावे, यासाठी महानगरपालिकेच्या मुख्यालयात एक खिडकी व्यवस्था कार्यान्वित केली आहे. झोन स्तरावरील आवश्यक कागदपत्रे व परवानग्या झोन कार्यालयातूनच दिल्या जाणार आहेत.

उमेदवारी अर्ज ऑफलाईन पद्धतीने निवडणुकीसाठी उमेदवारांना ऑफलाईन पद्धतीने अर्ज दाखल करावे लागणार आहे. उमेदवारांसाठी खर्चाची मर्यादा 15 लाख रुपये एवढी आहे. असे ही आयुक्त डॉ. चौधरी यांनी सांगितले.

**जाहिरातीसाठी पूर्वपरवानगी आवश्यक**

वर्तमानपत्रे, चॅनेल किंवा सोशल मिडीयावर उमेदवार किंवा राजकीय पक्षांना जाहिरात करण्यासाठी माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीची (एमसीएमसी) पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. या माध्यमातून उमेदवार किंवा राजकीय पक्षांनी जातीय तेढ निर्माण होईल किंवा सामाजिक सौहार्द बिघडविणारा मजकूर, छायाचित्रे किंवा चित्रफित पोस्ट करू नये, असेही आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी स्पष्ट केले.

# सेलू नगर परिषद निवडणूक : आज मतमोजणी, दुपारपर्यंत चित्र स्पष्ट

**दैनिक युवक आधार**

**सेलू /प्रतिनिधी शिवाजी पवार :** सेलू नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणूक–२०२५ च्या मतमोजणीस आज रविवार, २१ डिसेंबर २०२५ रोजी सुरुवात होत आहे. शहरातील १३ प्रभागांमधून निवडून येणाऱ्या नगरसेवकांसह नगराध्यक्ष पदासाठीचे निकाल आजच स्पष्ट होणार असल्याने राजकीय वातावरण तापले आहे.



सकाळी १० वाजता मतमोजणी प्रक्रियेला प्रारंभ होणार असून प्राथमिक माहितीनुसार दुपारपर्यंत म्हणजेच सुमारे १ वाजेपर्यंत अंतिम निकाल जाहीर होण्याची शक्यता आहे. या मतमोजणीसाठी एकूण १३ टेबलांची व्यवस्था करण्यात आली असून प्रत्येक टेबलावर तीन कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. संपूर्ण प्रक्रियेसाठी १०६ अधिकारी व कर्मचारी कार्यरत राहणार आहेत.

मतमोजणी पाच फेऱ्यांत पूर्ण होणार असून विशेष म्हणजे प्रत्येक प्रभागातील दोन नगरसेवक पदांसह नगराध्यक्ष पदाची मतमोजणी एकाच वेळी करण्यात येणार आहे. त्यामुळे निकालाच्या पहिल्या फेऱ्यांपासूनच राजकीय चित्र स्पष्ट होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.दरम्यान, निकालाच्या पार्श्वभूमीवर शहरात प्रचंड उत्सुकता निर्माण झाली असून विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते व समर्थक मतमोजणी केंद्र परिसरात गर्दी करताना दिसतील.

नगर परिषदेत सत्ता कुणाच्या हाती जाणार, कोणत्या उमेदवाराचे पारडे जड राहणार, याकडे संपूर्ण सेलू शहराचे लक्ष लागले आहे.

# शिवसेना ईशान्य मुंबई लोकसभा प्रभारीपदी माजी नगरसेवक उपेंद्र सावंत यांची नियुक्ती


**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** विक्रोळी कन्नमवार नगरचे माजी नगरसेवक उपेंद्र सावंत यांची शिवसेना ईशान्य मुंबई लोकसभा प्रभारीपदी नियुक्ती शिवसेना सचिव संजय मोरे यांनी नियुक्तीपत्र देऊन केली आहे.हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या आशिर्वादाने व शिवसेना मुख्य नेते व महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे.या नियुक्तीचा कालावधी एक वर्षाचा असणार आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे यांचा सक्रिय पणे प्रचार आणि प्रसार तसेच पक्षवाढीसाठी सर्वांना सोबत घेऊन कार्य करावे असे शिवसेना सचिव संजय मोरे यांनी पत्रात म्हटले आहे.



उपेंद्र सावंत यांनी १३ वर्ष शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विक्रोळी कन्नमवार नगर वार्ड क्रमांक ११८ शाखेचे शाखाप्रमुख पद भूषविले आहे. त्यांची निष्ठावंत शिवसैनिक म्हणून ओळख आहे.आपल्या नगरसेवकाच्या कारकीर्दीत त्यांनी कन्नमवार नगरचा कायापालट केला आहे.व त्यांनी समाजोपयोगी कामे केली आहेत.यावर्षी त्यांचा वार्ड मागासवर्गीय महिला म्हणून घोषित झाल्यामुळे त्यांची पून्हा नगरसेवक होण्याची संधी हुकली आहे.पण ते नाराज नाहीत.अखेरच्या क्षणापर्यंत आपण निष्ठावंत शिवसैनिक म्हणून जनतेची सेवा करणार असल्याचे म्हटले आहे.

# इंडियन स्ट्रीट प्रीमियर लीग मध्ये जासईच्या साहिल म्हात्रेची निवड



**पनवेल :** उरण तालुक्यातील जासई गावातील साहिश सुरेश म्हात्रे याची भारतातील सर्वात मोठ्या टेनिस क्रिकेट स्पर्धा इंडियन स्ट्रीट प्रीमियर लीग (ISPL) मध्ये सिनेस्टार अक्षय कुमार यांच्या मालकीच्या "श्रीनगर के वीर" या संघात निवड झाली आहे. या निवडीबद्दल भाजपचे नेते, माजी नगराध्यक्ष जे एम म्हात्रे, पनवेल पालिकेचे माजी विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांनी त्याचे अभिनंदन केले.

( दैनिक युवक आधार)

# भारती एअरटेल कंपनीच्या नेतृत्वबदलाची घोषणा

## गोपाळ विठ्ठल यांची पदोन्नती, नव्या वर्षांत शाश्वत शर्मा व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून पदभार स्विकारणार

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी ज्योत्सना करवाडे विदर्भ प्रमुख**

**नवी दिल्ली :** गेल्या १३ वर्षांपासून गोपाळ विठ्ठल यांनी भारती एअरटेलचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी पदाची जबाबदारी समर्थपणे पेलली आहे. ऑक्टोबर २०२४ रोजी कंपनीच्या सुनियोजित उत्तराधिकार प्रक्रियेचा भाग म्हणून गोपाळ विठ्ठल यांची भारती एअरटेलच लिमिटेडच्या उपाध्यक्षपदीदेखील नियुक्ती करण्यात आली होती. या बदल पक्रियेचा भाग म्हणून आता कंपनीच्या नेतृत्वात बदल करण्यात आले आहेत. गोपाल विठ्ठल यांच्याजागी शाश्वत शर्मा यांची कंपनीचे नियोजित मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नव्या वर्षांत शर्मा या नव्या पदाचा कार्यभार स्विकारतील. व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून यशस्वीरित्या काम पाहणा-या गोपाल विठ्ठल यांची पदोन्नती झाल्याचे कंपनीच्यावतीने जाहीर करण्यात आले आहे. १ जानेवारी २०२६ पासून गोपाळ विठ्ठल कंपनीच्या कार्यकारी उपाध्यक्ष पदाची सूत्रे सांभाळतील. गोपाळ विठ्ठल यांच्याकडे भारती एअरटेलसह कंपनीसह सर्व उपकंपन्यांच्या कामकाजाचे नेतृत्व आणि देखरेख करण्याची महत्त्वाची जबाबदारी असेल. विठ्ठल डिजिटल व तंत्रज्ञानासंबंधीच्या कामकाजांसह विविध निर्णय प्रक्रियेत सहभागी असतील. यात नेटवर्क धोरण, विविध कामकाजांविषयीची खरेदी प्रक्रिया तसेच मानव संसाधन या विविध



विभागांच्या कामकाजांचे समन्वय साधणे तसेच या सर्व प्रक्रियेत समूहाची एकात्मता वाढवणे आदी कामकाजांचा समावेश असेल. समूहाची धोरणात्मक दिशा ठरवणे आणि संस्थेला भविष्यातील बदलांसाठी सक्षम तसेच सज्ज करणे यावर त्यांचा विशेष भर देतील. भविष्यकालीन नवकल्पना, तांत्रिक प्रगती आणि दीर्घकालीन वाढ हे सुनिश्चित करण्यासाठी गोपाळ विठ्ठल यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. येत्या नवीन वर्षांच्या पहिल्या दिवसापासूनच शाश्वत शर्मा हे भारती एअरटेल इंडियाचे नवे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी पदाची धूरा सांभाळतील. गेल्या वर्षभरापासून शर्मा नव्या जबाबदारीच्या पूर्वतयारीचा सखोल अभ्यास करत आहेत. शर्मा हे नियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी या पदनामासह गोपाळ विठ्ठल यांच्यासोबत आगामी नियुक्त पदाची संपूर्ण माहिती घेत आहेत. शर्मा यांनी पूर्वतयारी प्रक्रियेतच कंपनीच्या विविध कामकाजांचा जवळून अनुभव घेतला आहे. नवीन पदभार स्विकारल्यानंतर ते गोपाळ विठ्ठल यांना ामकाजाचा अहवाल देत राहतील.

सध्या सौमेन रे हे भारती एअरटेल इंडियाचे मुख्य आर्थिक अधिकारी म्हणून काम पाहत आहे. येत्या काळात सौमेन रे यांची समूहाच्या मुख्य आर्थिक अधिकारी या पदावर नेमणूक केली जाईल. गोपाळ विठ्ठल यांच्या मार्गदर्शनाखाली सौमेन रे नव्या पदाचे कामकाज पाहतील. सौमेन रे यांनी गेल्या चार वर्षांपासून मुख्य आर्थिक अधिकारी पदाची धूरा अत्यंत यशस्वीपणे सांभाळली आहे. भारती एअरटेलची आर्थिक कामगिरी उंचावण्यात आणि कंपनीला आर्थिक स्थैर्यता प्राप्त करुन देण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे.

कंपनीचे फायनान्शिअल कंट्रोलर म्हणून काम पाहणा-या अखिल गर्ग यांची भारती एअरटेल इंडियाचे मुख्य आर्थिक अधिकारी म्हणून नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. गर्ग गेल्या १२ वर्षांपासून कंपनीच्या कामकाजात महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. या काळात त्यांनी कंपनीच्या विविध विभागांमध्ये महत्त्वाच्या जबाबदा-या पार पाडल्या आहेत. त्यांनी हेक्साकॉम आयपीओ यांसारख्या मोठ्या आणि महत्त्वाच्या व्यावसायिक प्रकल्पांचे यशस्वीरित्या नेतृत्व केले आहे. शाश्वत शर्मा आणि सौमेन रे यांच्या देखरेखीअंतर्गत अखिल गर्ग नव्या पदाचे कामकाज पाहतील. सध्या रोहित पुरी हे संयुक्त कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी म्हणून कार्यरत असून, त्यांचीही पदोन्नती जाहीर करण्यात आली आहे. पुरी आता कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी म्हणून सर्व कामकाज पाहतील. ग्रुप कंपनी सचिव पंकज तिवारी हे गट स्तरावर आपले नेतृत्व आणि देखरेख कायम ठेवणार असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली कंपनीच्या धोरणात्मक कामकाजाची प्रक्रिया सुरु राहील.

कंपनीच्या नेतृत्वबदलाबददल भारती एअरटेलचे अध्यक्ष सुनील भारती मित्तल यांनी समाधान व्यक्त केले. कंपनीच्या विविध पदांच्या यशस्वी हस्तांतराबद्दल भाष्य करताना ते म्हणाले की, ''एअरटेलमधील नेतृत्वाचा वारसा सोपवण्याची ही प्रक्रिया ज्या पद्धतीने पार पडली, त्याबद्दल मला अतिशय आनंद वाटत आहे. बदल आणि सातत्य हे दोन्ही एकत्रितपणे पुढे नेण्याचा यापेक्षा योग्य काळ असू शकत नाही. मला ठाम विश्वास आहे की, गोपाळ आणि शाश्वत हे दोघे भविष्यातही कंपनीच्या प्रगतीचा आणि यशाचा वेग कायम ठेवतील. मी दोघांनाही नवीन जबाबदा-यांसाठी मनापासून शुभेच्छा देतो.'' मित्तल यांनी कंपनीच्या भविष्याची वाटचाल सुयोग्य दिशेने सुरु असल्याचेही सूतोवाच दिले. ''कंपनीत अत्यंत उत्साही, कुशल आणि व्यावसायिक व्यवस्थापकीय संघ कार्यरत असल्याचा मला अभिमान आहे. आम्ही नावीन्यपूर्ण उद्योजकीय कौशल्याच्या जोरावर जगभरातील कोट्यावधी ग्राहकांना सर्वोत्तम तंत्रज्ञान आणि जागतिक दर्ज्याच्या सेवा पुरवत आहोत. मी गोपाळ तसेच संपूर्ण टीमसोबत काम करण्यास उत्सुक आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर सर्वोत्तम दूरसंचार कंपनी उभारण्याच्या आमच्या महत्त्वकांक्षेकडे वाटचाल करताना आम्ही हीच गुणवत्ता, सातत्या आणि नवकल्पनांची परंपरा पुढे नेण्याचा आमचा संकल्प आहे. '',असा निर्धार मित्तल यांनी व्यक्त केला.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## वांगी बुद्रुकचे सुपुत्र सुशील साळवे यांना वनस्पतीशास्त्रात 'पीएच.डी.' प्रदान

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/ सिल्लोड :** तालुक्यातील वांगी बु.येथील रहिवासी आणि अभ्यासू व्यक्तिमत्व सुशील सुखदेव साळवे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने वनस्पतीशास्त्र (Botany) विषयात नुकतीच विद्यावाचस्पती अर्थात 'पीएच. डी.' पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या यशामुळे वांगी बुद्रुकसह संपूर्ण परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.सुशील साळवे यांनी 'राहीझोस्पीयर मायक्रो फ्लोरा ऑफ इरिगेटेड अँड नॉन इरिगेटेड क्रॉप्स' या विषयावर आपला शोधप्रबंध सादर केला. त्यांच्या या संशोधनात सिंचन असलेल्या (ओलिताखालील)



आणि सिंचन नसलेल्या पिकांच्या मुळांलगत असलेल्या सूक्ष्मजीव सृष्टीचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. शेती उत्पादकता आणि जमिनीचा पोत सुधारण्याच्या दृष्टीने हे संशोधन अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे.या महत्त्वपूर्ण संशोधनासाठी त्यांना सिल्लोड येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. काकासाहेब बदर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. डॉ. बदर यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत चिकाटीने आणि शास्त्रीय पद्धतीने साळवे यांनी आपला हा प्रबंध पूर्ण केला.

दिनांक १९ डिसेंबर २०२५ रोजी विद्यापीठाने त्यांना अधिकृतपणे ही पदवी जाहीर केली. सुशील साळवे हे एका ग्रामीण भागातून पुढे येत त्यांनी शिक्षण क्षेत्रात मिळवलेले हे उत्तुंग यश तरुण पिढीसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

त्यांच्या या यशाबद्दल शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींनी त्यांचे कौतुक केले आहे.आपल्या यशाचे श्रेय सुशील साळवे यांनी त्यांचे मार्गदर्शक डॉ. काकासाहेब बदर, कुटुंबीय, मित्रपरिवार आणि शुभेच्छुकांना दिले आहे.

# पोलिस मित्र शिल्पा'वर धुळीची लेयर; स्वच्छतेकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे /अलिबाग :** अलिबाग समुद्रकिनारी रायगड जिल्हा पोलिस दलाच्या कार्याचा गौरव व्हावा, या उद्देशाने उभारण्यात आलेले 'पोलिस मित्र शिल्प' सध्या प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे धुळीच्या थराखाली झाकले गेले आहे.लोकार्पणानंतर काही दिवसांतच या शिल्पाच्या स्वच्छतेकडे पूर्णतः दुर्लक्ष झाल्याचे चित्र दिसून येत असून, त्यामुळे शिल्पाचे सौंदर्य व त्यामागील संकल्पनाच धूसर होत असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे.दि. ९ मार्च २०२५ रोजी महिला व बालविकास मंत्री



अदिती तटकरे यांच्या हस्ते या 'पोलिस मित्र शिल्पा'चे भव्य लोकार्पण करण्यात आले होते. अदिती तटकरे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या शिल्पाच्या लोकार्पण सोहळ्याला तत्कालीन जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.पोलिस दलातील अधिकारी, कर्मचारी तसेच महिला पोलिस कर्मचारी यांचे प्रतिनिधित्व करणारी तीन शिल्पे या ठिकाणी उभारण्यात आली असून, समाजाच्या सुरक्षेसाठी अहोरात्र कार्यरत असलेल्या पोलिस दलाचा सन्मान व्हावा, हा या शिल्पामागील मुख्य उद्देश आहे. तसेच अलिबाग समुद्र किनाऱ्यावर येणाऱ्या पर्यटकांसाठी हे शिल्प एक आकर्षक 'सेल्फी पॉइंट' म्हणूनही ओळखले जात आहे.

मात्र, शिल्प बसविल्यानंतर त्याची नियमित स्वच्छता, देखभाल व संरक्षण करण्याकडे प्रशासनाने साफ दुर्लक्ष केल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. शिल्पावर धुळीचे जाड थर साचले असून, काही ठिकाणी अस्वच्छतेमुळे त्याचा देखावा विद्रूप झाला आहे. यामुळे केवळ शिल्पाच्या सौंदर्यालाच नव्हे, तर पोलिस दलाच्या गौरवाला देखील बाधा पोहोचत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. लोकप्रतिनिधींच्या संकल्पनेतून आणि शासकीय पातळीवर उभारण्यात आलेल्या या शिल्पाची जबाबदारी निश्चितपणे कोणाची, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे. पर्यटनदृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणी असलेल्या या शिल्पाची नियमित स्वच्छता व देखभाल करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक नागरिक व पर्यटकांकडून होत आहे. जर वेळीच दखल घेतली नाही, तर गौरवाचे प्रतीक असलेले हे 'पोलिस मित्र शिल्प' दुर्लक्षाचेच उदाहरण ठरेल, अशी खंत व्यक्त होत आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकासाठी प्रस्तावित जागा खासगी विकासकाकडून परत घेण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार - उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

**दैनिक युवक आधार**
**मुंबई /प्रतिनिधी :** पुणे स्टेशनलगत मालधक्का चौकातील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) ताब्यात असलेली महत्त्वपूर्ण जागा पुन्हा शासनाच्या ताब्यात आणून ती पूर्णतः सार्वजनिक हितासाठी वापरण्याच्या दिशेने ठोस आणि निर्णायक प्रक्रिया सुरू झाली आहे. विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या पुढाकारातून झालेल्या आढावा बैठकीनंतर संबंधित विभागांनी कायदेशीर व प्रशासकीय पातळीवर आवश्यक कारवाई सुरू केल्याने या जागेवरील खासगी व्यावसायिक विकासाला स्पष्टपणे लगाम घालण्यात आला आहे.ही जागा पूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे होती. त्यानंतर ती एमएसआरडीसीकडे हस्तांतरित करण्यात आली आणि पुढे खासगी विकासक मे. एन. जी. व्हेंचर्स यांना ६० वर्षांच्या भाडेकरारावर देण्यात आली होती. मात्र, ही प्रक्रिया शासनाने स्थगित केल्यानंतर संबंधित विकासकाने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. "सदर जमीन ही सार्वजनिक हिताची असून प्रथम कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करूनच तिचा अंतिम उपयोग ठरवावा," असे स्पष्ट निर्देश डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आढावा बैठकीत दिले होते.

या पार्श्वभूमीवर एमएसआरडीसी तसेच पुणे महानगरपालिकेच्या बांधकाम विकास विभागाकडून महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. मंगळवार पेठ, पुणे येथील नगर भूमापन क्र. ४०५ मधील सुमारे ८९०० चौ. मीटर जमीन भाडेतत्त्वावर दिली असली तरी संबंधित विकासकाने ही जागा एमएसआरडीसीकडे परत दिली आहे. तसेच प्रत्यक्ष जागेवर सुरू असलेल्या सर्व कामांना पुढील आदेश येईपर्यंत स्थगिती देण्यात आली आहे. यानंतर पुणे महानगरपालिकेच्या बांधकाम विकास विभागाने खासगी विकासकाचा व्यावसायिक व वाणिज्य इमारतीचा प्रस्ताव अधिकृतरित्या फेटाळला आहे. मे. एन. जी. व्हेंचर्सतर्फे दाखल करण्यात आलेला व्यापारी/वाणिज्य इमारतीचा संपूर्ण प्रस्ताव नामंजूर करण्यात आल्याची माहिती महापालिकेने दिली आहे. त्यामुळे या जागेवर कोणताही खासगी व्यावसायिक वापर होणार नाही, हे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, या जागेच्या सार्वजनिक उपयोगाबाबत शासनासमोर दोन महत्त्वाचे प्रस्ताव आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीकडून 'आंबेडकर भवन'च्या विस्तारीकरणाची, तर ससून सर्वोपचार रुग्णालयाकडून कर्करोग रुग्णालय उभारणीची मागणी करण्यात आली आहे. या दोन्ही प्रस्तावांचा सामाजिक दृष्टिकोनातून सखोल अभ्यास करून, नागरिकांकडून सूचना व हरकती मागवून पारदर्शक विकास आराखडा तयार करण्याचे निर्देश डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले आहेत.एमएसआरडीसीची ही जागा शासनाच्या ताब्यात आणून तिचा वापर पूर्णतः जनहितासाठी व्हावा, या दिशेने सुरू झालेली ही कारवाई अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे मत डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केले आहे.

## फर्दापूर जवळील कल्पवृक्ष कलशाकार तीर्थक्षेत्रात चोरी; अज्ञात चोरांकडून जैन मंदिरातील पुरातन मूर्ती लंपास

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी/विजय काळे :** तालुक्यातील फर्दापूर–सोयगाव मुख्य रस्त्यालगत असलेल्या कल्पवृक्ष कलशाकार तीर्थक्षेत्र या जैन मंदिरात अज्ञात चोरांनी चोरी केल्याची घटना बुधवारी रात्री सुमारे दोन वाजेच्या सुमारास घडली.चोरांनी मंदिराच्या मुख्य लोखंडी दरवाजाचे कुलूप तोडले, त्यानंतर आतील लाकडी दरवाजाचे कुलूप फोडून काचेचा दरवाजा तोडत मंदिरात प्रवेश केला. यावेळी मंदिरातील पुरातन पद्मा देवीची अर्धा किलो वजनाची




चांदीची मूर्ती (अंदाजे किंमत ३० हजार रुपये) तसेच दोन किलो वजनाची पितळी पद्मा देवीची मूर्ती (अंदाजे किंमत १५ हजार रुपये) चोरून नेण्यात आली.मूर्तीवरील देवीचे वस्त्र बाजूला फेकून देत चोरटे घटनास्थळावरून पसार झाले. या घटनेची माहिती मंदिरातील साध्वी सपना सुभाष बडगुजर (वय ४२) यांनी फर्दापूर पोलीस स्टेशनला दिली.माहिती मिळताच फर्दापूर चे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रफुल साबळे यांच्यासह पोलीस कर्मचारी योगेश कोळी,जगदीश सोनवणे व फिरोज तडवी यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.पुढील तपास फर्दापूर पोलीस करीत आहेत.

## भक्तीतून 'जलक्रांती'! जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराजांच्या प्रेरणेने आसडीत श्रमदानातून उभारला 'वनराई बंधारा'

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/ सिल्लोड :** जगद्गुरु रामानंदाचार्य श्री नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सत्संग सेवा समितीच्या माध्यमातून सिल्लोड तालुक्यातील आसडी येथे श्रमदानातून 'वनराई' कच्चा बंधारा बांधण्यात आला आहे. पर्यावरणाचे रक्षण आणि पाणी टंचाईवर मात करण्याच्या उद्देशाने राबवण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

नदी-नाल्यांचे पाणी अडवून ते जमिनीत जिरवण्यासाठी संप्रदायामार्फत 'पाणी अडवा, पाणी जिरवा'



ही मोहीम राबवली जात आहे. आसडी येथील सेवा केंद्राच्या पुढाकाराने भाविक आणि कार्यकर्त्यांनी एकत्र येत एका दिवसात हा बंधारा पूर्ण केला. यामुळे परिसरातील भूजल पातळी वाढण्यास मदत होणार असून, शेतीसह गुरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार आहे.

**यांची लाभली उपस्थिती :**

या सामाजिक कार्यात आसडी सेवा केंद्राचे अध्यक्ष गणपत मिरगे आणि महिला अध्यक्षा तारामतीबाई सुरडकर यांच्यासह तालुका कार्यवाहक गहिनीनाथ सिरसाट, दिलीप वैष्णव, संतोष टेकाळे, कृष्णा सुरडकर आणि माणिकराव टेकाळे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच 'माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलीस मित्र समिती सिल्लोडच्या वतीने संजय सोनवणे, केशवराव मिरगे, संतोष सुरडकर, देवाजी मिरगे आणि सिताराम मिरगे यांनी सहभागी होऊन श्रमदान केले. या मोहिमेत परिसरातील गुरुबंधू , भगिनी, साधक आणि भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. अध्यात्म आणि समाजकार्य यांची सांगड घालत राबवलेला हा उपक्रम परिसरातील इतर गावांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## 'विज्ञान-गणिताची जादू' विभागीय स्पर्धेत कल्याणी तुपे-गाडेकर यांनी मारली बाजी; आता राज्यस्तरावर दाखवणार कसब!

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/ सिल्लोड :** छत्रपती संभाजीनगर विभागीय स्तरावर शिक्षक आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या "विज्ञान व गणिताचा जादूगार" या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत सिल्लोड तालुक्यातील वांगी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शिक्षिका श्रीमती कल्याणी सुखदेव तुपे-गाडेकर यांनी प्रथम क्रमांक पटकावून घवघवीत यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाने केवळ सिल्लोड तालुक्याच्याच नव्हे, तर संपूर्ण जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, त्यांची आता राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.




विभागीय स्तरावर झालेल्या या स्पर्धेत अनेक दिग्गज शिक्षक व अधिकाऱ्यांनी सहभाग नोंदवला होता. मात्र, श्रीमती कल्याणी तुपे-गाडेकर यांनी विज्ञान आणि गणित या विषयांना अत्यंत सोप्या आणि मनोरंजक पद्धतीने मांडत आपल्या उत्कृष्ट सादरीकरणाने परीक्षकांची मने जिंकली. वांगी बुद्रुक (केंद्र: भराडी) येथे प्राथमिक पदवीधर शिक्षण सेवक म्हणून कार्यरत असलेल्या कल्याणी तुपे-गाडेकर यांनी कठीण समजले जाणारे हे विषय विद्यार्थ्यांपर्यंत 'जादू' वाटावे इतक्या सहजतेने कसे पोहोचवता येतात, याचे जिवंत उदाहरण या स्पर्धेतून मांडले.

त्यांच्या या उल्लेखनिय कामगिरीबद्दल शिक्षण विभाग, शाळा व्यवस्थापन समिती, सहकारी शिक्षक आणि परिसरातील नागरिकांकडून त्यांचे कौतुक होत आहे. ग्रामीण भागातील एका शिक्षिकेने विभागीय स्तरावर मिळवलेले हे यश इतर शिक्षकांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.राज्यस्तरीय स्पर्धेसाठी त्यांची निवड झाल्याने सिल्लोड तालुका आणि भराडी केंद्राच्या नावलौकिकात मोठी भर पडली आहे . त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, आगामी राज्यस्तरीय स्पर्धेतही त्यांनी अशाच प्रकारे यश संपादन करावे, यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या जात आहेत

## महाड चवदार तळे सत्याग्रह शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर रायगडचे खा. सुनील तटकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची घेतली भेट

**दैनिक युवक आधार**
**तळा प्रतिनिधी नितीन लोखंडे :** रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी नवी दिल्ली येथे केंद्र गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान महामानव बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड येथे अस्पृश्यांना पाणी मिळण्याच्या संदर्भात चवदार तळे येथे 20 मार्च 1927 रोजी सत्याग्रह केला. या ऐतिहासिक सत्याग्रहाला 2027 रोजी शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. या पार्श्वभूमीवर महाड चवदार तळे येथे महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रीय स्मारक व संग्रहालय उभारण्या बाबतचा प्रस्ताव रायगडचे खा. सुनील तटकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित



शहा यांच्याकडे सादर केला.

महाड चवदार तळे सत्याग्रहाला महाडची सामाजिक क्रांती तसेच महाडचा मुक्तिसंग्राम संग्राम म्हणूनही ओळखले जाते. चवदार तळ्याचे पाणी सर्वांसाठी खुले व्हावे अस्पृश्यांनाही या पाण्याचा वापर करता यावा याकरिता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी 20 मार्च 1927 रोजी आपल्या अनुयायांसह या ठिकाणी सत्याग्रह केला. चवदार तळे सत्याग्रह समता सामाजिक न्याय आणि मानवी हक्कांच्या लढ्याचे एक ऐतिहासिक प्रतीक आहे. या लढ्याची आठवण तसेच समतेचे प्रतीक म्हणून पर्यटन या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर भेट देत असतात. हा सत्याग्रह सामाजिक समानतेसाठी महत्त्वाचा टप्पा मानला जातो.

शताब्दी वर्षानिमित्त महाड येथील ऐतिहासिक वारसा स्थळाला राष्ट्रीय महत्त्व प्राप्त करून देण्यासंदर्भात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी सखोल आणि सकारात्मक चर्चा केली.

या चर्चेदरम्यान 2027 सालच्या शताब्दी सोहळ्या निमित्ताने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उभारण्यात येणारे स्मारक व संग्रहालय प्रादेशिक तसेच राष्ट्रीय पातळीवर अभिमानाची बाब ठरेल. त्यामुळे अभ्यासक विद्यार्थी पर्यटकांसाठी चवदार तळे है ऐतिहासिक प्रेरणास्थान बनेल. तसेच एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक सांस्कृतिक पर्यटन केंद्र म्हणून विकसित होईल. असा विश्वास या भेटीदरम्यान व्यक्त केला.

महाड व रायगड या दोन्ही ऐतिहासिक वारसांचे एकत्रीकरण केल्यास स्थानिक पर्यटन वाढेल तसेच रोजगार उद्योगधंद्याला चालना मिळेल.

या दृष्टिकोनातूनच या प्रकल्पासाठी केंद्र सरकारने 300 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा अशी विनंती खा. सुनील तटकरे यांनी केंद्रीय गृहमंत्र्यांकडे केली.

## पुर्णा नगर परिषदेकडून अतिक्रमण हटविण्याकडे दुर्लक्ष; डॉ . बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरात वाढते अतिक्रमण

**दैनिक युवक आधार**
**पुर्णा (प्रतिनिधी) : शिवाजी लोंढे :** पुर्णा नगर परिषदेच्या हद्दीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरात दिवसेंदिवस अतिक्रमण वाढत असून, यामुळे वाहतूक कोंडीसह नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. मात्र या गंभीर समस्येकडे नगर परिषद प्रशासनाचे अद्यापही दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

आंबेडकर चौक हा पुर्णा शहरातील एक महत्त्वाचा व वर्दळीचा चौक आहे. येथे रस्त्याच्या कडेला बेकायदेशीर टपऱ्या, हातगाड्या, दुकाने तसेच अव्यवस्थित पार्किंगमुळे रस्त्याची रुंदी कमी झाली



आहे. परिणामी पादचाऱ्यांना चालणे कठीण झाले असून वाहनधारकांना अपघाताचा धोका वाढला आहे.

स्थानिक नागरिकांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी अनेक वेळा नगर परिषदेकडे तक्रारी करूनही अद्याप ठोस कारवाई करण्यात आलेली नाही.

"नगर परिषदेला अजूनही अतिक्रमण हटविण्यास मुहूर्त सापडत नाही का?" असा सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळील परिसर हा सामाजिक व ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचा असतानाही येथे अस्वच्छता, अव्यवस्था आणि अतिक्रमणाचे साम्राज्य पसरले आहे.

नगर परिषद प्रशासनाने तात्काळ लक्ष देऊन अतिक्रमण हटवावे, परिसर सुशोभित करावा व वाहतूक सुरळीत करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

जर लवकरात लवकर कारवाई झाली नाही, तर नागरिक आंदोलनाचा मार्ग स्वीकारतील, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

## ग्रामपंचायत सदस्यांना दहा वर्षापासून मानधन मिळेना,किरण पाटील वझरकर यांनी ग्रामविकास मंत्र्यांच्या विशेष कर्तव्य अधिकाऱ्यांनाच लावला फोन

**दैनिक युवक आधार**

**महादेव उप्पे/देगलूर :** ग्रामीण भागातील मिनी मंत्रालय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ग्रामपंचायत कार्यालयातील सदस्यांच्या बळावरच गावाचा विकास अवलंबून असतो व या सदस्यांना महिना दोनशे रुपयांचा तुटपुंजी अशी मानधन मिळत असते परंतू हि तुटपुंजी मानधन मागील दहा वर्षापासून दिले जात नसल्यामुळे देगलूर तालुक्यातील मौजे वझर येथील माजी ग्रामपंचायत सदस्य किरण पाटील वझरकर यांनी महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे विशेष कर्तव्य अधिकारी( OSD) सानप यांच्याशी संपर्क साधल्याची चर्चा सुरू आहे.



सविस्तर माहिती अशी की,देगलूर तालुक्यातील मौजे वझर येथील माजी ग्रामपंचायत सदस्य किरण पाटील यांनी देगलूर येथील पंचायत समिती कार्यालयात वारंवार ग्रामपंचायत सदस्यांच्या मानधनाविषयी विचारणा केली असता उडवाउडवीचे उत्तर मिळत असल्याने महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे विशेष कर्तव्य अधिकारी सानप(OSD) यांच्याशी फोनवर सपर्क साधून ग्रामीण भागातील ग्रामपंचायत कार्यालयातील सदस्यांच्या मानधनाविषयी चर्चा केली असता विशेष कर्तव्य अधिकारी सानप यांनी तात्काळ ग्रामपंचायत सदस्यांचा मानधन देण्यात येईल असे आश्वासन दिले असल्याचे किरण पाटील वझरकर यांनी सांगितले.

यावेळी देगलूर पंचायत समितीचे सहाय्यक विस्तार अधिकारी आश्विन कुरूदे यांना संपर्क साधला असता सद्या निवडणूक असल्याकारणाने व देगलूर तालुक्यातील १०५ ग्रामपंचयतीमधून काही ग्रामपंचायत कार्यालयातील सदस्यांच्या बँक खाते क्रमांक व आयएफसी कोडमध्ये तफावत असल्यामुळे ते परत मागविण्यात आले आहे.ते जमा झाल्याझाल्या सर्व सदस्यांचे मानधन जमा करण्यात येणार असल्याचे सांगितले,परंतू वझर येथील माजी ग्रामपंचायत सदस्य किरण पाटील यांनी सांगितले की, किमान तीन ते चार वेळेस आधार कार्ड बँक खाते क्रमांक आयएफसी कोड नंबर देऊन सुद्धा उडवाउडवीचे उत्तर मिळत असल्याचे सांगितले जाते.

# एम.डी. मॅफेड्रॉन विक्री करणाऱ्यांवर पोलिसांची कारवाई; लाखोंचा मुद्देमाल जप्त

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** नाशिक शहरात अंमली पदार्थांची विक्री व तस्करी रोखण्यासाठी पोलीस आयुक्त मा. संदिप कर्णिक यांच्या आदेशान्वये राबविण्यात येत असलेल्या विशेष मोहिमेत अंमली पदार्थ विरोधी पथकाने मोठी कारवाई करत एम.डी. (मॅफेड्रॉन) अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या दोन तरुणांना अटक केली आहे. या कारवाईत एकूण १ लाख ७५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या प्रभारी वपोनि सुशिला कोल्हे यांना गोपनीय माहिती मिळाली की, रोहन बिपीन गोठी (वय १८, रा. शिवराम बिल्डिंग, किशोर नगर, राणेनगर, नाशिक) व समीर अमोल वानखेडे (वय १८, रा. महाकाली चौक, सिडको, नाशिक) हे दोघे होंडा शाईन ग्रे




रंगाची मोटारसायकल (क्र. एम.एच. १५ के.व्ही. ६९८६) वरून एम.डी. अंमली पदार्थ विक्रीसाठी घेऊन येणार आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार इंदिरानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जाजू शाळेसमोरील मोकळ्या मैदानात, राणेनगर परिसरात अंमली पदार्थाची विक्री होणार असल्याचे समजताच वपोनि सुशिला कोल्हे यांनी तात्काळ पथकातील अधिकारी व अंमलदारांना सूचना देत सापळा रचण्याचे आदेश दिले.अंमली पदार्थ विरोधी पथकाने शिताफीने सापळा रचून दोन्ही आरोपींना रंगेहाथ पकडले. झडतीदरम्यान आरोपींकडून एकूण ८ ग्रॅम वजनाचा एम.डी. (मॅफेड्रॉन) अंमली पदार्थ, अंदाजे ४०,००० रुपये किमतीचा तसेच मोटारसायकल व इतर साहित्य असा एकूण १,३५,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. एकूण जप्त मुद्देमालाची किंमत १,७५,००० रुपये इतकी आहे.

या प्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, नाशिक शहर यांच्याकडून सुरू आहे. आरोपींकडून अंमली पदार्थ कुठून आणले व कोणाला विक्री करणार होते, याबाबत सखोल तपास करण्यात येत आहे.

ही कारवाई मा. पोलीस आयुक्त संदिप कर्णिक, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) किरणकुमार चव्हाण, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) संदिप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.या यशस्वी कारवाईत वपोनि सुशिला कोल्हे, सपोनि सचिन चौधरी, सपोनि विशाल पाटील, सपोउनि ताजणे, सपोउनि गायकर, सपोउनि बेंडाळे तसेच पोलीस अंमलदार डंबाळे, कोल्हे, सौंदाणे, नांद्रे, सानप, बागडे, फुलपगारे व मपोअं अर्चना भड यांचा समावेश होता.

नाशिक शहर पोलीस दलाच्या या कारवाईमुळे अंमली पदार्थ विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली असून, भविष्यातही अशाच कठोर कारवाया सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिसांकडून देण्यात आला आहे.

## जासई हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे विविध कला गुणदर्शन

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर :** रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेज जासई ,या विद्यालयात दिनांक १९ डिसेंबर २०२५ वार शुक्रवार या दिवशी विविध कला गुणदर्शन कार्यक्रम संपन्न झाला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे चेअरमन मा. अरुण शेठ जगे साहेब, उडन पंचायत समितीचे माजी उपसभापती श्री नरेश शेठ घरात तसेच सर्व स्थानिक सल्लागार समितीचे सदस्य उपस्थित होते. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ म्हात्रे के जी मॅडम उप मुख्याध्यापक श्री कुटे सर, पर्यवेक्षिका सौ मुकादम मॅडम आणि इतर मान्यवर उपस्थित होते .शाळेच्या मुख्याध्यापिका व



इतर मान्यवरांनी कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन केले.शाळेच्या मुख्याध्यापिका सौ म्हात्रे के जी मॅडम यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले. तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री अरुण शेठ जगे साहेब यांनी नटरंगच्या प्रतिमेचे पूजन केले. उपस्थित मान्यवरापैकी श्री काशिनाथ मढवी, शाळेचे व्हाईस चेअरमन श्री डी आर म्हात्रे साहेब तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री जगे साहेब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व शुभेच्छा दिल्या. सर्व वर्गांचे कार्यक्रम संपन्न झाले. शेवटी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ म्हात्रे के जी मॅडम यांनी सर्व मान्यवरांचे व उपस्थित शिक्षण प्रेमी व कलाप्रेमींचे आभार मानले. तसेच कार्यक्रमासाठी भरघोस देणगी देणाऱ्या थोर देणगीदारांचे विद्यालयाकडून शतशः आभार . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री गाताडी सर व श्रीमती घरत एम के मॅडम यांनी केले. सर्व शिक्षक वृंदांनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी जी मेहनत घेतली व स्वयंसेवक इयत्ता आठवी अ व नववी अ या विद्यार्थ्यांचे आभार मानून कार्यक्रम संपन्न झाला.

## राजकीय पक्षांनी निवडणूक आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करावे – मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ . अभिजीत चौधरी यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी/नागपूर :** नागपूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकी दरम्यान सर्व राजकीय पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या आदर्श निवडणूक आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी केले.

निवडणूक आचारसंहितेच्या संदर्भात शहरातील राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींशी चर्चा केली.

यावेळी मुख्य वित्त व लेखा अधिकारी श्री. सदाशिव शेळके, उपायुक्त श्री. निर्भय जैन , उपायुक्त श्री. मिलिंद मेश्राम, सहाय्यक आयुक्त श्री. श्याम कापसे प्रामुख्याने उपस्थित होते.

निवडणुकीसाठी उमेदवारांना अडचण जाणार नाही, याची काळजी घेतली जात असून, सर्व झोन कार्यालयांमध्ये निवडणूक अधिकारी राहणार आहेत. तसेच उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी उमेदवारांना आवश्यक ना हरकत पत्रे घेणे सोईचे व्हावे,




यासाठी महानगरपालिकेच्या मुख्यालयात एक खिडकी व्यवस्था कार्यान्वित केली आहे. झोन स्तरावरील आवश्यक कागदपत्रे व परवानग्या झोन कार्यालयातूनच दिल्या जाणार आहेत.

**उमेदवारी अर्ज ऑफलाईन पद्धतीने**

निवडणुकीसाठी उमेदवारांना ऑफलाईन पद्धतीने अर्ज दाखल करावे लागणार आहे. उमेदवारांसाठी खर्चाची मर्यादा 15 लाख रुपये एवढी आहे. असे ही आयुक्त डॉ. चौधरी यांनी सांगितले.

**जाहिरातीसाठी पूर्वपरवानगी आवश्यक**

वर्तमानपत्रे, चॅनेल किंवा सोशल मिडीयावर उमेदवार किंवा राजकीय पक्षांना जाहिरात करण्यासाठी माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीची (एमसीएमसी) पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.

या माध्यमातून उमेदवार किंवा राजकीय पक्षांनी जातीय तेढ निर्माण होईल किंवा सामाजिक सौहार्द बिघडविणारा मजकूर, छायाचित्रे किंवा चित्रफित पोस्ट करू नये, असेही आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी स्पष्ट केले.

## बुटीबोरी MIDC दुर्घटनाः 6 कामगारांचा मृत्यू, मुख्यमंत्री फडणवीसांची तातडीची मदत जाहीर

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** नागपूर येथील बुटीबोरी एमआयडीसी परिसरातील एका खासगी कंपनीत झालेल्या भीषण औद्योगिक दुर्घटनेत सहा कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून नऊ कामगार जखमी झाले आहेत. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी या दुर्घटनेवर तीव्र दुःख व्यक्त करत मृत कामगारांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. जखमी कामगारांवर सध्या उपचार सुरू असून त्यांना लवकर आरोग्य लाभावे, अशी प्रार्थनाही त्यांनी केली आहे.

मुख्यमंत्री स्वतः नागपूर जिल्हाधिकाऱ्यांच्या संपर्कात असून संपूर्ण प्रकरणावर प्रशासनाकडून बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय ठेवून मदतकार्य वेगाने सुरू असल्याची माहिती देण्यात आली आहे.

या दुर्घटनेतील मृतांच्या वारसांना राज्य सरकारतर्फे प्रत्येकी *5 लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे. तसेच संबंधित कंपनीने मृतांच्या कुटुंबीयांना 30 लाख रुपये तर जखमी कामगारांना 10 लाख रुपये व संपूर्ण उपचार खर्च देण्याचे मान्य केले आहे.औद्योगिक सुरक्षेच्या दृष्टीने ही घटना गंभीर मानली जात असून दुर्घटनेच्या कारणांची चौकशी सुरू करण्यात आली आहे.

## विज्ञान प्रदर्शनामध्ये जीनियस किड्स इंटरनॅशनल स्कूल तालुक्यातून अव्वल

**दैनिक युवक आधार**

**माहूर प्रतिनिधी सय्यद ईसा :** 53 वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन माहूर येथील श्री जगदंबा हायस्कूल मध्ये मंगळवारी 16 डिसेंबरला झाले या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटक माहूर तहसीलचे तहसीलदार अभिजीत जगताप तसेच गटशिक्षणाधिकारी , माहूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक देविदास चोपडे शिक्षण विस्तार अधिकारी संग्राम कांबळे, गंगाधर बिरमवार हे सर्व उपस्थित होते जवळपासच्या शंभरहून अधिक शाळांनी या प्रदर्शनात भाग नोंदविला त्यामध्ये जीनियस किड्स इंटरनॅशनल स्कूल माहूर येथील विद्यार्थ्यांनी माहूर तालुक्यातून प्रथम स्थान पटकाविला



आहे. व त्यांच्या प्रयोगाला प्रथम क्रमांक देण्यात आला या प्रयोगाचे सादरीकरण ऋषिकेश पिल्लावार, कन्हैया जयस्वाल, नैतिक राठोड इयत्ता नववीतील विद्यार्थ्यांनी केले. या प्रयोगासाठी सहकार्य व मार्गदर्शन विज्ञानाचे शिक्षक सोहेल चव्हाण सर व आकाश राठोड सर यांनी केले तसेच मुख्याध्यापक संतोष कुमार व उपमुख्याध्यापक आयफाज शेख यांचे सुद्धा मोलाचे सहकार्य केले आधुनिक तंत्रज्ञान आणि बदलत्या युगाचा विचार करून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा या उद्देशाने अशा विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन केले यातून उद्याचे शास्त्रज्ञ घडविण्यात जीनियस किड्स इंटरनॅशनल स्कूल ची महत्त्वाची भूमिका बजावत आहे असे मत गटशिक्षणाधिकारी संतोष शेटकार यांनी व्यक्त केले. यावेळी जीनियस किड्स इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक अध्यक्ष भाग्यवान भवरे यांनी सर्वांचे अभिनंदन केले तर महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे माहुर तालुकाध्यक्ष शेषराव पाटील यांनी पुढील शैक्षणिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा व्यक्त केल्या.

## अजिंठ्याच्या डोंगररांगांत 'कुऱ्हाड' रडतेय! वनविभागाच्या डोळ्यांदेखत लाकडाची दिवसाढवळ्या तस्करी

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड :** एकीकडे वाढत्या जागतिक तापमानाचा विचार करून शासन 'झाडे लावा, झाडे जगवा' असा नारा देत कोट्यवधी रुपये खर्च करत असताना, दुसरीकडे जागतिक वारसा लाभलेल्या अजिंठा वनपरिक्षेत्रात मात्र याच्या उलट चित्र पाहायला मिळत आहे. या परिसरात सध्या मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड सुरू असून, लाकडाने गच्च भरलेले ट्रक अजिंठा गावातून थेट घाटाच्या मार्गाने मार्गस्थ होत आहेत. विशेष म्हणजे, हे सर्व सुरू असताना वनविभागाचे अधिकारी आणि कर्मचारी मात्र 'मूग गिळून गप्प' असल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.अजिंठ्याचा परिसर हा नैसर्गिक संपदेने नटलेला भाग आहे. परंतु, गेल्या काही दिवसांपासून या वनसंपदेवर



लाकूडमाफियांचा डोळा पडला आहे. रात्रीच्या अंधारातच नव्हे, तर आता भरदिवसाही लाकडाची वाहतूक करणारे ट्रक या भागातून खुलेआम फिरताना दिसत आहेत. वनविभागाच्या नाकाखाली हा सर्व प्रकार सुरू असूनही कोणतीही कारवाई होताना दिसत नाही. यामुळे 'कुंपणच शेत खात आहे की काय?' अशी शंका आता स्थानिकांकडून उपस्थित केली जात आहे.शासनाकडून दरवर्षी वृक्षारोपणाच्या मोठ्या मोहिमा राबवल्या जातात, प्रशासकीय यंत्रणा झाडे वाचवण्याचे आवाहन करते. मात्र, अजिंठ्यात हजारो झाडांची कत्तल होऊन ती थेट ट्रकमध्ये भरून सीमेबाहेर जात असताना वन अधिकारी केवळ बघ्याची भूमिका घेत आहेत. या तस्करीमुळे पर्यावरणाचे कधीही न भरून निघणारे नुकसान होत असून वन्यजीवांच्या अधिवासावरही गदा आली आहे.या गंभीर प्रकरणाकडे वरिष्ठ वनाधिकाऱ्यांनी तात्काळ लक्ष देऊन ही वृक्षतोड थांबवावी आणि या अवैध प्रकाराला मूक संमती देणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निसर्गप्रेमींकडून केली जात आहे.

जर ही वृक्षतोड अशीच सुरू राहिली, तर अजिंठ्यातील हिरवाई लवकरच इतिहासजमा होईल, अशी भीती व्यक्त होत आहे.

## सिंदखेड राजा येथील संत सावता इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालया मध्ये राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या पुण्यतिथी साजरी करण्यात आली

**दैनिक युवक आधार**

**जाफराबाद टेंभूर्णी प्रतिनिधी/अनिल ससाने :** सिंदखेड राजा येथील संत सावता इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथे राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली यावेळी कार्यक्रमाचे सुरुवातीला शाळेचे संस्थापक अध्यक्ष प्रा .बळीराम जाधव सर यांच्या




शुभहस्ते राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी शाळेचे प्राचार्य सुधाकर गोफने सर तसेच सह -शिक्षक कर्मचारी जयश्री जाधव, अभिजित मेहत्रे, तेजराव घुगे, वैष्णवी अंभोरे,पायल पवार, रूक्मिणी तौर, दिपाली सातपुते, सपना कदम व मनीष बुंधे यांच्या सह विद्यार्थी व पालकांची ही उपस्थिती होती. तसेच विद्यार्थांनी मनोगत व्यक्त केले... प्राचार्य सुधाकर गोफने सर यांनी संत गाडगेबाबा यांच्या जीवनकार्यावर सविस्तर विद्यार्थांना मार्गदर्शन केले.. सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेची इयत्ता नववी चे विद्यार्थी आयास चौधरी, कार्यक्रमाचे प्रास्ताविक इरफान चौधरी व आभार प्रदर्शन इयत्ता आठवी ची विद्यार्थी कु.पल्लवी पवार हिने केले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलीस मित्र तसेच दैनिक युवक आधार यांच्या संयुक्त विद्यमानाने तालुकास्तरीय 8 वी. N.M.M.S महा सराव पेपरचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा ग्रामीण प्रतिनिधी/ सिद्धांत शंकरराव चिंचाणे :** दिनांक.19/12/2025. वार शुक्रवार रोजी माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलीस मित्र तसेच दैनिक युवक आधार यांच्या संयुक्त विद्यमानाने तालुकास्तरीय 8 वी. N.M.M.S महा सराव पेपरचे आयोजन..या महापरिक्षेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग एकूण 460 विद्यार्थी सहभागी. परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते या परीक्षेचे सेंटर हे पाथरी तालुक्यातील शंकराव चव्हाण महाविद्यालय हे होते. या स्पर्धेसाठी एकूण 15 शाळांनी सहभाग नोंदवला होता त्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा माळीवाडा, श्री चक्रधर स्वामी विद्यालय कानसुर ,माध्यमिक विद्यालय रेनापुर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पोहे टाकळी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा झरी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लोणी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बोरगव्हाण,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मानवत, नरसिंह गुरुकुल कुंभारी पिंपळगाव, शांताबाई नखाते विद्यालय पाथरी, कै. स. गो. नखाते विद्यालय देवनांद्रा, कै. मातोश्री धोंडाबाई प्राथमिक शाळा लोणी, जिल्हा



परिषद प्राथमिक शाळा वडी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हदगाव. इत्यादी शाळांनी या स्पर्धेत सहभागी नोंदवला होता ही परीक्षा





अत्यंत शिस्तबद्ध आणि पारदर्शक पद्धतीने राबवण्यात आली.या परीक्षेसाठी मोलाचे सहकार्य लाभले शंकराव चव्हाण विद्यालय पाथरी यांचे .तसेच या परीक्षेसाठी प्रमुख उपस्थिती म्हणून ॲड. मुंजाजी भाले पाटील (काका) तसेच शिवाजी तात्या चिंचाने. शंकराव चव्हाण महाविद्यालय मुख्याध्यापक दिवाण सर हे होते.तसेच ही परीक्षा उत्कृष्ट पद्धतीने पार पाडण्यासाठी खालील शिक्षकांनी सहकार्य केले विष्णू वाघमारे सर चक्रधर स्वामी विद्यालय कानसुर,अंभोरे सर मुख्याध्यापक पोहे टाकळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, टेंगसे सर मुख्याध्यापक रेनापुर माध्यमिक विद्यालय, गणेश शिंदे सर आणि सिद्धेश्वर सूर्यवंशी सर ज्ञानगंगा गुरुकुल पाथरीशेंडगे सर नरसिंह गुरुकुल कुंभारी पिंपळगाव,भोंडवे सर धोंडाबाई विद्यालय लोणी, वांगीकर सर सी.पी. एस मानवत,बेंबडे सर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा माळीवाडा,टेकाळे मॅडम जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बोरगव्हाण.

या सर्व शिक्षक बंधूंनी परीक्षा अत्यंत पारदर्शकपणे राबवण्यासाठी आपला अमूल्य वेळ दिल्याबद्दल परीक्षेचे आयोजन करता सिद्धांत शंकराव चिंचाने. ( माहिती अधिकार पत्रकार संरक्षण समिती जिल्हा उपाध्यक्ष तसेच दैनिक युवक आधार ग्रामीण प्रतिनिधी परभणी ) यांनी या सर्वांचे मनापासून आभार व्यक्त केले व आपला कायम ऋणी राहील हा शब्द व्यक्त करत परीक्षा यशस्वीपणे पार पडली असे जाहीर केले.

# तानाजी पिसे यांची सलग दुसऱ्यांदा बिनविरोध अध्यक्षपदी निवड

**दैनिक युवक आधार**

**कर्जत, मिरजगांव/सतीश शिंदे :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मिरजगाव (मुले) येथील शालेय शिक्षण व्यवस्थापन समितीला दोन वर्ष पूर्ण झाले असता शाळेच्या व्यवस्थापन समितीचे पुनर्गठण करण्याची प्रक्रिया व नुतन समिती नेमणुक प्रक्रिया मंगळवार दि.16 डिसेंबर 2025 रोजी इयत्ता पहिली ते इयत्ता आठवी च्या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांच्या पालकांच्या उपस्थितीत पार पडली.



एकूण 17 सदस्यीय समिती निर्माण करण्याचे मीटिंगमध्ये सर्वानुमते एकमत झाले. त्यामध्ये 50% महिला पालक प्रतिनिधी,एक दिव्यांग विद्यार्थी पालक प्रतिनिधी,एक दुर्बल व वंचित घटक पालक प्रतिनिधी (एस.टी) आणि यामध्ये मुख्याध्यापक हे कायमस्वरूपी सदस्य व इतर तीन राखीव सदस्य सोडता एक शिक्षण तज्ञ व बाकीच्या बारा सदस्यांमध्ये 50% महिला म्हणजे सहा पुरुष व सहा महिला अशी इच्छुक उमेदवारांमधून नूतन शालेय शिक्षण व्यवस्थापन समिती निर्माण करण्यात आली.

नंतर या निवडलेल्या बारा सदस्यांमधून अध्यक्षपदाची निवड करण्यात आली.अध्यक्ष पदासाठी एकमेव उमेदवार म्हणून श्री.तानाजी ज्ञानदेव पिसे उभे राहिले असता इतर 11 सदस्यांनी त्यांना बिनविरोध पाठिंबा देऊन अध्यक्षपदी निवड करण्यात आली व महिलांमधून सौ.प्रिय सुभाष गांगर्डे यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

ही निवडणूक शाळेचे मुख्याध्यापक श्री.नितीन काळे सर,श्री.शेख सर,श्री. कारंजकर सर यांच्या उपस्थितीत व निरीक्षणाखाली पार पडली. शालेय शिक्षण व्यवस्थापन समितीचे नूतन अध्यक्ष श्री.तानाजी ज्ञानदेव पिसे व नूतन उपाध्यक्षा सौ.प्रिया सुभाष गांगर्डे यांचे सर्व माता-पालक, पिता पालक व शिक्षक वृंद यांनी अभिनंदन केले. तानाजी पिसे हे मागील दोन वर्षांमध्ये त्यांनी शाळेसाठी दिलेल्या सहकार्य व शाळेमध्ये पुरविलेल्या सुविधा व त्यांचे कामकाज पाहून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मिरजगाव (मुले) येथील शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षपदी दुसऱ्यांदा बिनविरोध निवडून आल्याबद्दल सर्व ग्रामस्थांमधून व परिसरामधून त्यांचे कौतुक केले जात आहे, मिरजगांव आणि परिसरात सामाजिक व शैक्षणिक कार्यात त्यांचा नेहमीच पुढाकार असतो,

# पोलीस ठाणे वाठोडा खुनाचे गुन्ह्यातील जामीनावर असलेल्या आरोपीने साक्ष न देण्यासाठी साक्षीदारास धमकी दिल्या बाबत केलेली कारवाई

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** पोलीस ठाणे वाठोडा येथे तक्रार प्राप्त झाली की, नंदनवन पोलीस ठाणे येथील अपराध क्रमांक 38/2019 कलम 302, 323,34, भा द वि, सत्र न्यायालय केस क्रमांक 757/2019 मधील जामीनावर असलेला आरोपी विशाल विनायक गजभिये यानी, यातील साक्षीदार यांना त्याचे विरोधात खोटी साक्ष देण्यासाठी किंवा साक्ष न देण्यासाठी धमकी दिल्या बाबत पोलीस ठाणे वाठोडा येथे आज दिनांक 19/12/2025 रोजी तक्रार



प्राप्त झाल्याने, कलम 232 BNS अन्वये तात्काळ तक्रार दाखल करून आरोपी विशाल विनायक गजभिये याचा शोध घेऊन त्याला तात्काळ अटक करून माननीय न्यायालयामध्ये हजर केले असता माननीय न्यायालयाने MCR मंजूर करून आरोपीस सेंट्रल जेल येथे पाठवले आहे.

तसेच नमूद आरोपी चा खुनाच्या गुन्ह्यातील जामीन रद्द होण्याबाबत कारवाई करण्यात येत आहे.मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ क्रमांक 5 नागपूर शहर व सपोआ पारडी विभाग यांचे मार्गदर्शनामध्ये, सदर तक्रारीची पोलीस ठाणे वाठोडा यांनी तात्काळ दखल घेऊन प्रभावी कारवाई केल्यामुळे आरोपीवर कायदेशीर कारवाई केल्याने त्याची दहशत संपुष्टात येऊन यातील साक्षीदार हे त्याच्या दबावात न येता आपली साक्ष निर्भीडपणे कोर्टामध्ये देण्यास मदत होणार आहे.

# कल्याण ग्रामीणचे माजी आमदार श्री सुभाष भोईर यांचा भाजपामध्ये प्रवेश

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत, कल्याण ग्रामिण प्रतिनिधी :** शिवसेना उ.बा.ठा.गटाचे कल्याण ग्रामीणचे माजी आमदार श्री. सुभाष भोईर यांनी दिनांक २०/१२/२५ रोजी भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष श्री. रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला त्यांच्याबरोबर श्री प्रदीप आलीमकर यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला श्री.सुभाष भोईर हे ठाणे महानगर पालिके मध्ये सलग पाच वेळा नगरसेवक, ठाणे महानगर पालिके मध्ये चार वेळा विरोधी पक्ष नेता तसेच अडीच वर्षे



विधानपरिषद सदस्य आणि पाच वर्षे विधानसभा सदस्य म्हणून कामगिरी केली आहे, राजकारणात अतिशय मात्तब्बर आणि ज्येष्ठ नेते म्हणून त्यांची ठाणे जिल्ह्यात ओळख आहे ठाणे महानगर पालिके तील मुंब्रा,दिवा तसेच कल्याण ग्रामीण मधील बऱ्याचशा भागात त्यांचा मतदारांसोबत दांडगा असा जनसंपर्क आहे ऐन महापालिका निवडणुकीच्या तोंडावर भाजपमध्ये प्रवेश केल्याने भाजपाला चांगले अशी बळकटी ठाणे महानगर पालिका क्षेत्रात मिळण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही.

# किनवट नगर परिषद प्रशासकीय इमारतीत 6 टेबलवर 5 फेऱ्यात होणार मतमोजणी ; प्रशासन सज्ज -निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. शारदा चौंडेकर

**दैनिक युवक आधार**

**किनवट प्रतिनिधी विशाल भालेराव :** रविवारी (ता.21 डिसेंबर 2025) सकाळी 10 वाजता पासून किनवट नगर परिषद प्रशासकीय इमारतीत पहिल्या मजल्यावर उभारलेल्या मतमोजणी कक्षात किनवट नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक 2025 ची मतमोजणी प्रक्रिया सुरू होणार असून 6 टेबलवर 5 फेऱ्यात मतमोजणीसाठी प्रशासनाने सर्व प्रकारे तयारी केली आहे. असे तहसीलदार तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. शारदा चौंडेकर यांनी कळविले आहे.0 प्रभागातून एक अध्यक्ष व 21 सदस्य निवडून देण्यासाठी मंगळवारी (ता. 2 डिसेंबर) मतदान घेण्यात आले होते. 29 मतदान केंद्रावर पुरुष 12334 पैकी 9438 , स्त्री 13256 पैकी 9568 व ईतर 03 पैकी 2 असे एकूण 25593 पैकी 19008 मतदारांनी (74 . 27 टक्के) मतदानाचा हक्क बजावला होता. अध्यक्षपदासाठी 8 व सदस्यपदांसाठीच्या 90 उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात नोंदवले होते. ही मतदान यंत्रे किनवट नगर परिषदेच्या पहिल्या मजल्यावरील स्ट्राँगरूममध्ये सशस्त्र पोलिस बंदोबस्तात सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या निगराणीत ठेवण्यात आली होती.पहिल्या टप्प्यातील निवडणूक कार्यक्रमान्वये नियोजित असलेली 3 डिसेंबरची मतमोजणीची तारीख मा. न्यायालयाच्या आदेशानुसार पुढे ढकलण्यात येऊन सुधारित निवडणूक कार्यक्रमांतर्गत नियोजित असलेल्या मतमोजणीच्या दिवशी म्हणजेच रविवारी (ता. 21 डिसेंबर 2025) सकाळी 10 वाजेपासून घेणेबाबत सर्व जिल्हाधिकारी यांना निर्देशित करण्यात आले होते. त्यानुसार किनवट नगर परिषद सावित्रिक निवडणूकीची मतमोजणी होणार आहे. याकरिता 6 टेबल ठेवण्यात आले असून 5 फेऱ्या होणार आहेत. प्रत्येक टेबलवर 1 मतमोजणी पर्यवेक्षक , 1 मतमोजणी सहायक व 1 शिपाई राहणार आहे. मतमोजणी परिसरात चोख पोलिस बंदोबस्त राहणार असल्याने उमेदवार , निवडणूक प्रतिनिधी व टेबलनिहाय एका उमेदाराच्या एका मतमोजणी प्रतिनिधीस मतमोजणी कक्षात प्रवेशाची अनुमती राहणार आहे. त्यांना देण्यात आलेल्या ओळखपत्र पासेस द्वारेच प्रवेश दिला जाणार आहे. मोबाईल अथवा इतर कोणतेही इलेक्ट्रॉनिक्स डिव्हाईस सोबत आणण्यास परवानगी नाही. एका फेरीत दोन प्रभागाची मतमोजणी होणार आहे. ह्यावेळी त्याच प्रभागाचे उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनाच बाहेरील मुख्य प्रवेशद्वारातून प्रवेश दिला जाईल.पहिली फेरी सकाळी 10 वाजता सुरू होणार असल्याने प्रभाग एकशी संबंधितांना सकाळी 9 वाजता प्रवेश देण्यात येईल. ही मतमोजणी प्रक्रिया कायदा व सुव्यवस्था राखून शांततेत पार पाडण्यासाठी सर्व जनतेंनी प्रशासनास सहकार्य करावे , असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. शारदा चौंडेकर यांनी केले आहे. निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. शारदा चौंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याधिकारी तथा सहायक निवडणूक अधिकारी विवेक कांदे, नायब तहसिलदार तथा अतिरिक्त सहायक निवडणूक चंद्रशेखर सहारे, नायब तहसीलदार म. रफिक म. बशीरोद्दीन, नायब तहसीलदार बालाजी फोले, निलेश राठोड, मीडिया नोडल अधिकारी तथा मास्टर ट्रेनर उत्तम कानिंदे व मल्लिकार्जून स्वामी आदिंसह अधिकारी-कर्मचारी ही मतमोजणी प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी कटाक्षाने कार्यरत आहेत.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली बळीराजा पाणंद रस्ते योजना लागू - आमदार सुरेश धस

## खर्चमुक्त, यांत्रिकीकरणासह शेतरस्ते उभारणीचा लाभ घेण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** राज्यातील शेतकऱ्यांच्या दैनंदिन अडचणी दूर करून शेतीला गती देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अभ्यासपूर्ण व दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना' राज्यभर लागू करण्यात आली असून, ही योजना शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडविणारी ठरणार असल्याचे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले आहे. शासनाने शेतकरी हिताचा विचार करून घेतलेला हा ऐतिहासिक निर्णय असून, संबंधित शेतकऱ्यांनी शासन निर्णय व अध्यादेशाचा सखोल अभ्यास करून नियमानुसार सर्व प्रक्रिया पूर्ण करत या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे ही त्यांनी आवाहन केले. आमदार सुरेश धस पुढे म्हणाले की, या योजने अंतर्गत



शेत रस्त्यांसाठी आवश्यक असलेली मोजणी तसेच पोलीस बंदोबस्तासाठी लागणारी संपूर्ण शुल्करचना पूर्णतः माफ करण्यात आली आहे. तसेच रस्ते बांधकामासाठी लागणाऱ्या गाळ, माती व मुरुमासाठी कोणते ही स्वामित्व शुल्क आकारले जाणार नसल्याने शेतकऱ्यांवरील आर्थिक भार मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. शेत रस्त्यांच्या निर्मितीसाठी शंभर टक्के यांत्रिकीकरणास परवानगी देण्यात आल्यामुळे कामे कमी वेळेत, अधिक दर्जेदार आणि टिकाऊ पद्धतीने पूर्ण होतील. या सोबतच गाव नकाशातील अधिकृत पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमणे तात्काळ हटविण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याने अनेक वर्षांपासून बंद पडलेले किंवा अडथळ्यात अडकलेले शेत रस्ते पुन्हा खुले होणार आहेत. त्या मुळे शेतमाल वाहतूक सुलभ होऊन वेळेची बचत होईल, खर्च कमी होईल आणि शेतीतील उत्पादन बाजारात पोहोचविणे अधिक सोपे होणार आहे. आपत्कालीन प्रसंगी आरोग्य सेवा, यंत्र सामग्री व इतर सुविधा थेट शेतापर्यंत पोहोचण्यासही मदत होणार आहे. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने या योजनेत रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून (मनरेगा) वृक्षारोपण करणे बंधनकारक करण्यात आले असून, त्या मुळे ग्रामीण भागात हरित विकासाला चालना मिळणार आहे. रस्ते विकासासोबतच रोजगार निर्मिती आणि पर्यावरण संरक्षण यांचा समन्वय या योजनेतून साधला जात असल्याचे आमदार धस यांनी नमूद केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी केंद्रित, पारदर्शक आणि परिणामकारक योजना सातत्याने राबविल्या जात असून, बळीराजा पाणंद रस्ते योजना ही त्याचे उत्तम उदाहरण आहे. त्या मुळे प्रत्येक शेतकरी, ग्रामस्थ व स्थानिक लोकप्रतिनिधींनी एकत्र येऊन शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रस्ताव सादर करावेत, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी आणि या सुवर्णसंधीचा पूर्ण लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले आहे.

# स्कूल व्हॅन आणि रिक्षाला डंपरची धडक, वाहनांचे मोठे नुकसान

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :**नवीन पनवेल सिग्नल जवळ सिग्नल वर उभ्या असलेल्या स्कूल व्हॅन आणि रिक्षाला पाठीमागून आलेला डंपरने ठोकर मारून अपघात केला. या अपघातात स्कूल व्हॅन आणि रिक्षाचे मोठे नुकसान झाले. या अपघातात रिक्षाचालक, पॅसेंजर तसेच स्कूल व्हॅनमधील दोन मुले जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले.

२० डिसेंबर रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास नवीन पनवेल सिग्नल जवळ स्कूल व्हॅन क्रमांक एम एच ४६ बी यु ७१२३ आणि रिक्षा क्रमांक एम एच ४६ सीडी ०९९५ या वाहनांना पाठीमागून आलेला डंपर क्रमांक एम एच ०४ एफ पी ९१४२ ने धडक दिली. अपघातात स्कूल व्हॅनचे दरवाजे लॉक झाल्याने मुले स्कूल व्हॅनमध्ये अडकून पडली. घटनास्थळी आणि आजूबाजूला असणारे पनवेल शहर वाहतूक शाखेचे अधिकारी, अंमलदार यांनी व्हॅनची काचेची खिडकी फोडून व बाजूचे पाईप ओढून बारा मुलांना व्हॅनमधून सुखरूपपणे बाहेर काढले.





तसेच रिक्षा चालक हा रिक्षामध्ये अडकल्याने आणि जखमी झाल्याने रिक्षाची फ्रेम ओढून आणि फुटलेली काच तोडून त्याला बाहेर काढण्यात आले.

अपघात झाल्यानंतर डंपर चालकाला मारहाण करण्याचा प्रयत्न केला मात्र वाहतूक पोलिसांनी या डंपर चालकाला पनवेल शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

# क्षेत्र सहायक परवानग्या जुळवण्यात व्यस्त; पोफाळी क्षेत्रात बिबट्याची गस्त

## बिबट्याचा शेतकऱ्यावर प्राणघातक हल्ला; आरडाओरडा केल्याने शेतकऱ्याचा वाचले प्राण

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी/राजू गायकवाड :** वन्यजीवांचा पाण्याच्या व शिकारीच्या शोधात गावाकडे वाढता कूच ही बाब कालच बातमीच्या माध्यमातून समोर आली होती. त्याच पार्श्वभूमीवर आज पोफळी परिसरात शेतकऱ्यावर बिबट्याने थेट हल्ला केल्याची गंभीर घटना घडली असून भीतीने शेतकरी, मजूर वर्गात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

उमरखेड तालुक्यातील पोफाळी येथील रहिवासी शंकर ज्ञानबा खंदारे यांच्यावर कळमुला नाल्याजवळ सायंकाळी चार ते पाच वाजताच्या दरम्यान बिबट्याने हल्ला केल्याची घटना घडली. हल्ल्यात ते जखमी झाले असून, त्यांना तातडीने पुढील उपचारासाठी उमरखेड येथे हलविण्यात आले,उमरखेड येथील रुग्णालयात



प्रथमोपचार करून नंतर त्यांना यवतमाळ येथे संदर्भित करण्यात आले.

विशेष म्हणजे, कालच पोफाळी व परिसरात बिबट्याच्या वाढत्या वावराबाबत बातमी प्रसिद्ध झाली होती. त्यात पोफाळी, कळमुला, अंबाळी, जनुना, पळशी, नागापूर, नागवाडी, पाथरवाडी, शेनंद, सावरगाव (बंगला), धनज, मोहदरी, तरोडा आदी गावांमध्ये बिबट्याची दहशत पसरल्याचे नमूद करण्यात आले होते. मात्र अवघ्या २४ तासांतच प्रत्यक्ष हल्ल्याची घटना घडल्याने वनविभागाच्या उपाययोजनांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

उघडपने बिबट्या फिरून शेतकऱ्यांवर हल्ले करत असताना वनविभागाचे कर्मचारी झोपा काढत आहेत का असा प्रश्न सामान्य नागरिक करत आहेत,

सद्या रब्बी हंगामातील पिकांना पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांना रात्री उशिरापर्यंत शेतात जावे लागत असून, बिबट्याच्या वावरामुळे शेतकऱ्यांचे जीव धोक्यात आला आहे. काही ठिकाणी जनावरांवर हल्ल्याच्या घटनाही घडल्याचे सांगितले जात आहे.

या घटनेनंतर परिसरातील नागरिकांमध्ये प्रचंड घबराट पसरली असून, वनविभागाने केवळ इशारे न देता तातडीने ठोस पावले उचलावीत, बिबट्याच्या हालचालींवर कॅमेरे, पिंजरे व नियमित गस्त वाढवावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.पोफाळी परिसरात सध्या भीती, संताप आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले असून, पुढील अनर्थ टाळण्यासाठी वनविभागाने तात्काळ कठोर उपाययोजना कराव्यात, अन्यथा नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशाराही ग्रामस्थ देत आहेत.

**क्षेत्र सहायक परवानग्या जुळवण्यात व्यस्त, बिबट्याची परिसरात गस्त**

पाऊणमारी परिसरात अनधिकृत सागवान तोडीच्या प्रकरणातील चौकशीच्या व पंचनामाच्या कारवायामुळे क्षेत्र सहाय्यक कार्यालयीन कामकाजात कागदपत्र जुळवण्यात अडकून पडल्याची चर्चा नागरिकात असल्यामुळे क्षेत्र सहायक परवानग्या जुळवण्यात व्यस्त आणि बिबट्याची परिसरात गस्त हेच वाक्य सध्या परिसरातील कास्तकाराच्या तोंडून ऐकायला मिळत आहे

# पुण्यातील नामांकित महाविद्यालात बोर्ड ऑफ स्टडी मेंबर म्हणुन निवड

## तुपटाकळी येथील युवक गौरव राऊत याचा सन्मान

**दैनिक युवक आधार**

**उमेश साखरकर दिग्रस प्रतिनिधी :** तूपटाकळी गावातील रहिवासी असलेल्या गौरव रमेश राऊत या तरुणाची पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी सलग्न असलेल्या आबासाहेब गरवारे महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागात बोर्ड ऑफ स्टडी मेंबर म्हणून नेमणूक करण्यात आली.



कालेजमध्ये 'बोर्ड ऑफ स्टडीज' मेंबरची निवड म्हणजे विशीष्ट विषयाचा अभ्यासक्रम ठरवण्यासाठी, सुधारण्यासाठी आणि शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी तज्ज्ञ प्राध्यापक, उद्योग क्षेत्रातील व्यक्ती आणि माजी विद्यार्थ्यांची समितीवर निवड करण्यात येते गौरवचे शिक्षण याच महाविद्यालयातुन झाले प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण गावातील अच्चूत दुलप्पा अत्तेवार हायस्कुल या ठिकाणी झाले. त्यानंतर मनात जिद्द होती काहीतरी नवीन करण्याची याच उद्देशाने पुण्यातील आबासाहेब गरवारे महाविद्यालयात प्रवेश घेऊन बी.ए ची पदवी ग्रहण केली. गौरवला सुरवातीपासूनच समाजकार्याची खूप आवड होती. पदवीचे शिक्षण घेतल्यानंतर पुण्यातील नामांकित महाविद्यालातुन कर्वे इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सर्विस मधुन समाज कार्याची पदवी ग्रहण केली. त्यानंतर वेगवेगळ्या सामजिक संस्थांमध्ये पाच वर्ष कामाचे अनुभव घेतला आणि त्यानंतर मित्रासोबत मिळून मृदुगंध सोशल कनेक्ट या संस्थेची स्थापना केली.

मृदुगंध सोशल कनेक्ट या संस्थेच्या मार्फत आज ग्रामीण भागात काम करणाऱ्या वेगवेगळ्या सामजिक संस्थांचे प्रोडक्ट पुण्यातील वेगवेगळ्या स्तरावर प्रमोट करत आहेत.

आज गौरवने एका छोट्या गावातुन येऊन स्वतःच एक वेगळ अस्तित्व निर्माण केल. आपल्या शिक्षणाचा उपयोग समाजाच्या कल्याणासाठी करायचा असा दृढ निश्चय बाळगुण आज गौरव काम करतोय हे त्याच्या नावाप्रमाणेच गौरवास्पद आहे.गौरवला भावी वाटचालीसाठी शुभेच्छा

# न थांबता समाजाची सेवा करणाऱ्या सरस्वती काथारा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** निवडणुकांचं पडघम आटोपल्यानंतर राजकारणातून अलिप्त होणारी माणसं आपण पाहिली असतील. पण काही माणस सर्वसामान्य जनतेची काम करण्यात कायम दंग झालेली असतात. २०१७ मध्ये पनवेल महानगरपालिकेच्या निवडणूकीनंतर समाजाशी नाळ जोडल्याने गेली आठ वर्ष अविरतपणे निःस्वार्थीपणे काम करणाऱ्या सरस्वती काथारा ह्यांना लहानपणापासूनच राजकारणाचे बाळकडू वडिलांकडून मिळाले. वडिलांचा राजकीय प्रवास जवळून पाहिल्याने समाजाची सेवा करणे, विकासकामे, गोरगरीब, अडला नडल्यांना मदत करणे, महिलांच्या खांद्याला खांदा लावून त्यांचे प्रश्न सोडविणे, तर समाजाची सेवा करण्याची कल्पकता राजकारणातील डावपेच अगदी जवळून पाहत आले.२१ व्या वर्षात राजकीय प्रवासाला सुरुवात केली. शेतकरी कामगार पक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात असताना अनेक पदांचा पदभार त्यांनी स्वीकारला. आता भाजपमध्ये सक्रिय झाल्यानंतर सामाजिक हितासाठी कामांचा झंजावात सुरूच आहे. २०१७ मध्ये त्यांनी पनवेल महानगरपालिकेची निवडणूक लढवली होती. पण त्यांच्या पदरी निराशा



झालेली पाहायला मिळाली. निवडणुकीतील पराभव पाहिल्यानंतर बरीचशी मंडळी समाजाची सेवा करण्यापासून वंचित होताना दिसतात. पण पराभवानंतरही गेली आठ वर्ष त्या जनतेच्या सानिध्यात आहेत. राजकारण आणि समाजकारण या एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात, राजकारणामध्ये राहूनही समाजकारण करणारी माणसे निराळीच. सरस्वती काथारा ह्या सर्व अडचणींवर मात करत मागील आठ वर्षापासून अविरतपणे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, कला, क्रीडा क्षेत्रात कार्यरत असताना नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या हॉस्पिटल, पोलीस स्टेशन, शाळेच्या प्रवेशासाठी सहकार्य करणे, शालेय विद्यार्थ्यांना मदतीचा हात म्हणून शैक्षणिक साहित्यांचे वाटप करणे, प्रभागातील युवकांना क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहित करणे, महिलांसाठी मोफत देवदर्शन, हळदी कुंकवाचे आयोजन, महिलांच्या मनोरंजनासाठी खेळ पैठणीचा कार्यक्रमाचे आयोजन करणे, सार्वजनिक गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दहीहंडी, क्रिकेटच्या स्पर्धा, अडल्या नडल्यांना आर्थिक मदतीचा हात, स्वयंरोजगारासाठी महिलांना प्रशिक्षण शिबिर, महिला सशक्ति करण्यासाठी पुढाकार असे विविध प्रकारचे कार्यक्रम समाजाच्या हितासाठी त्या गेल्या अनेक वर्षापासून करत आहेत. निवडणुका डोळ्यासमोर ठेवून समाजाची सेवा करणे समाजासाठी धावून जाणे त्यांनी कधीच सोडले नाही. गोरगरिबांच्या खांद्याला खांदा लावून सरस्वती काथारा त्यांच्यासोबत राहिल्या आहेत. अशी दुर्मिळ माणसं पाहायला मिळतात.

# सटाणात पाचशे रुपयांच्या बनावट नोटा जप्त ; बोगस चलनी नोटांचे रॅकेट उघडकीस येण्याची शक्यता

## आरोपीना पाच दिवसांची पोलीस कोठडी

**दैनिक युवक आधार**

**बागलाण प्रतिनिधी/ दीपक गायकवाड :** बागलाण तालुक्यात बनावट नोटा सापडल्याने एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण असून आरोपी पोलिसांच्या ताब्यात आले आहेत.संशयित यांच्यावर गुन्हा दाखल झाला असून ७ आरोपी पोलिसांच्या अटकेत असून न्यायालयाने पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.सटाणा ताहाराबाद रस्त्यावरील हिंदुस्तान पेट्रोलियमच्या जवळ रात्री




गस्ती पथकातील पोलिसांना रेनॉल्ट कंपनीच्या ट्रिबर कार घेऊन जाणाऱ्यांवर संशय व गुप्त माहिती मिळाली असता आरोपींना हटकले असता त्यांनी दिलेल्या संशयास्पद उत्तराने वाहनाची तपासणी करण्यात आली यात पाचशे रुपयाची बनावट नोटा सापडल्या सटाणा पोलिस अधिकाऱ्यांनी संशयित आरोपीना जेरबंद केले परंतु सटाण्यात यात्रोत्सव दरम्यान व्यापाऱ्यांना बनावट नोटा चालनात आल्याची भिती सतावत आहे.मोठी टोळी पोलिसांच्या गळाला लागण्याची शक्यता असून जायखेडा,ताहाराबाद, अंतापुर येथील तरुणांचा समावेश आहे. ४ लाखावर मुद्देमाल जप्त करण्यात आली यात मोबाईल, कार, बनावट नोटा १४००० हजारच्या आसपास असल्याचे समजते. या कार्यवाईमुळे पोलीस दलाचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

# वाशिम येथे महाराष्ट्र शासनाचे सहा महिन्याचे नवीन सुधारित ग्रंथपालन प्रशिक्षण

**दैनिक यूवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी/ रणजितसिंह ठाकुर :** महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अंतर्गत असलेल्या ग्रंथालय संचालनालयाची मान्यता असलेले सहा महिन्याचे नवीन सुधारित ग्रंथपालन प्रशिक्षण वाशिम येथे सुरू करण्यास जिल्हा ग्रंथालय संघ वाशिम या जिल्हास्तरीय संस्थेस नुकतीच मान्यता मिळाली असून हे प्रशिक्षण सहा महिन्याचे राहणार असून या प्रशिक्षणाचे वर्ग आठवड्याच्या दर शनिवारी आणि रविवारी सकाळी ११ ते ४ या वेळेत होणार आहेत या प्रशिक्षणाच्या माध्यमातून शाळा कॉलेजमधील विद्यार्थ्यांना सुशिक्षित बेरोजगार युवकांना युवतींना रोजगाराच्या



अनेक संधी निर्माण होणार आहेत हे प्रशिक्षण शाळा ,महाविद्यालय, सार्वजनिक ग्रंथालय ,केंद्रीय विद्यालय ,आश्रम शाळा न्यायालय, रेल्वे विभाग, आयटीआय , महानगरपालिका, खाजगी कंपन्या, आकाशवाणी केंद्र, प्रसार माध्यमे यासारख्या ठिकाणी ग्रंथपाल ,सहाय्यक ग्रंथपाल ,ग्रंथालय सेवक,ग्रंथालय परिचर आणि आरोग्य विभागात व इतर शासकीय निम शासकीय कार्यालयात अभिलेखा पाल , पुस्तक बांधणी कार ज्युनिअर कॅट लागर यासारख्या महत्वाच्या पदाकरिता हे प्रशिक्षण पात्र असून या प्रशिक्षणाकरिता प्रवेश पात्रता किमान बारावी कोणत्याही शाखेतून उत्तीर्ण असणे आवश्यक आहे त्याचप्रमाणे या प्रशिक्षणाकरिता विद्यार्थी,पुरुष , महिला कर्मचारी ,खाजगी कर्मचारी यांना कोणत्याही प्रकारचे वयाचे बंधन राहणार नाही त्याचप्रमाणे प्रशिक्षण प्रवेशाकरिता कोणत्याही मूळ प्रमाणपत्राची आवश्यकता नाही करिता ज्या विद्यार्थ्यांना कर्मचाऱ्यांना सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना शाळा कॉलेजमधील विद्यार्थ्यांना शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांना या प्रशिक्षणामध्ये प्रवेश घ्यावयाचा असल्यास इच्छुकानी श्रीमती मालतीबाई सरनाईक विद्यालय बस स्टँड समोर वाशिम येथे कार्यालयीन दिवशी सकाळी 11 ते 4 या वेळेत प्रत्यक्ष संपर्क करून प्रशिक्षणाचे माहितीपत्रक व अर्ज प्राप्त करून व प्रशिक्षणाची प्रवेशाची प्रक्रियापूर्ण करून प्रशिक्षणा करीता प्रवेश घेता येईल. शाळा कॉलेज मधील विद्यार्थ्यांनी सुशिक्षित बेरोजगार युवक युवतीनी ,स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी कर्मचाऱ्यांनी व ग्रंथ प्रेमी नागरिकांनी, या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा असे प्रशिक्षनचा प्रमुख तथा जिल्हा ग्रंथालय संघाचे प्रमुख कार्यवाह यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे

# लोकाभिमुख तहसीलदार अभय मस्के यांचा वाढदिवस वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला

**दैनिक युवक आधार**

**एम.डी.सूरोशे महागाव (यवतमाळ) :** गोरगरिब जनतेच्या अडचणींना सदैव जाणून घेणारे आदरणीय अभय मस्के तहसीलदार महागाव यांचा वाढदिवस आज साधेपणात व सामाजिक उपक्रमातून साजरा करण्यात आला. वाढदवसानिमित्त तहसील कार्यालयाच्या प्रशासकीय इमारत परिसरात तहसीलदार श्री अभय मस्के यांच्या हस्ते वृक्षरोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत त्यांनी एक व्यक्ती एक वृक्ष या संकल्पनेचा आग्रह धरला. तहसीलदार श्री अभय मस्के यांचे प्रशासकीय कार्य, शिस्त, पारदर्शकता व संवेदन शिलतेचा आदर्श मानले जाते. सामान्य



नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत. न्याय व विकास यांचा समतोल साधत त्यांनी महागाव तहसील मध्ये प्रभावी कामकाज केले आहे.

गोरगरीब, शेतकरी, कष्टकरी व सर्वसामान्य जनतेचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. या प्रसंगी तहसील कार्यालयातील अधिकारी कर्मचारी तसेच पत्रकार मंडळी, तसेच प्रतिष्ठित नागरिक व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. त्यांच्या पुढील वाटचलीसाठी उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभो ही सदिच्छा व्यक्त करण्यात आली.

# श्रीक्षेत्र मुल्हेर येथे शैनेश्वर मंदिराला रंगकाम पूर्ण तर रात्री ह. भ. प. ज्ञानेश्वर माऊली थोरकर याचे किर्तन

**दैनिक युवक आधार**

**बागलाण प्रतिनिधी - दिपक गायकवाड :** मार्गशीर्ष महिन्यातील शनी अमावस्याचे अवचित्य साधून मुल्हेरवासियांनी शैनेश्वर मंदिर,परिसर हा फुलांनी सजवण्यात आला. मंदिराला नाविन्यपूर्ण रंगरंगवटी पूर्ण करून विद्युत रोषणाई अप्रतिम करण्यात आली या प्रसंगाचे औचित्य साधत सकाळी नऊ वाजता सत्यनारायण पूजा करण्यात आली.

सत्यनारायण पूजेसाठी ३ दाम्पत्यांना सहपत्नीक मान मिळाला यात दिलीप गायकवाड, धणेश






महाले,शिरीष सूर्यवंशी यांनी पूजा केली पंडित म्हणून सुनील पंडित यांनी पूजा सांगितली.

दुपारी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

सायंकाळी ज्ञानेश्वर माऊली यांचे कीर्तन होणार असल्याचे सांगण्यात आले.

या कार्यक्रमासाठी अभिषेक परदेशी, दिलीप गायकवाड यांनी प्रत्येकी ११११११ रुपये ,निलेश जाधव-७७७७ रुपये तर त्रंबक सुर्यवंशी, हरिभाऊ बत्तीसे, गजेंद्र चव्हाण ५१००, सागर अहिरे, मोठा भाऊ जगताप ३१००, हिराचंद सुर्यावशी २५००, उद्धव सोनवणे, विजय सूर्यवंशी, रमेश सोनवणे,योगेश सोनवणे, दत्तू सोनवणे, नाना जगताप, सुनील येवला,नाना जगताप, तुषार तिवारी, सोनू दाभाडे, नरेंद्र कोठावदे यांनी प्रत्येकी २१०० रुपये, बापू वेताळ ११११ रू, बन्सीलाल बत्तीसे, अनिल पंडित, नितीन बत्तीशे, गणेश महाले, भगवान सोनवणे, काशिनाथ गवळी, बापू बत्तीसे, दीपक पवार यांनी ११०० रू तर रघुनाथ भदाने यांनी ५०० रुपये देणगी दिलेत तर डॉ. मनोज क्षीरसागर, स्वामी चव्हाण, शंकर ताटीवर यांनी अन्नदान , पाणीपुरवठा सुनील चव्हाण यांनी केले कार्य यशस्वीसाठी सुनील गायकवाड, बापू वेताळ, निलेश जाधव, मनोज अहिरे, प्रभाकर गवळी, गोविंदा गवळी, शकील शेख, चेतन अहिरे, सोमनाथ बागुल, प्रवीण हगवणे आदी ग्रामस्थांनी मेहनत घेतली.

# टेंभुर्णी येथे भव्य कुस्ती स्पर्धेचा आयोजन ; एकूण तबबल दोन लाख रुपयाचे बक्षीस

**दैनिक युवक आधार**

**टेंभूर्णी प्रतिनिधी/अनिल ससाने :** जालना जिल्ह्यातील जाफराबाद तालुक्यात टेंभुर्णी शहरात दत्त यात्रा तसेच संत चंदन बाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त यंदाही भव्य कुस्तीची आयोजन करण्यात आले होते मागील वर्षी मिळालेला प्रतिसादामुळे यंदा अधिक भव्य स्वरूपात ही स्पर्धा झाली या स्पर्धेमध्ये कुस्तीप्रेमी व नामावंत कुस्तीकार मोठ्या संख्येने सहभाग झाले होते यात्रा समिती व आयोजकांनी या स्पर्धेमध्ये एकूण रुपये दोन लाख रुपयाची बक्षीस ठेवण्यात आले होते व अंतिम विजेत्यास 11 हजार रुपये रोख बक्षीस देण्यात आले या कुस्ती स्पर्धेचा उद्घाटन



सोहळा जिल्हा परिषद सदस्य मा. शालीकराव मस्के यांच्या हस्ते काल सकाळी अकरा वाजता उद्घाटन सोहळा संपन्न झाला

या कुस्ती स्पर्धेसाठी टेंभुर्णी सरपंच गौतम मस्के व उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य तसेच पंचक्रोशीतील सरपंच उपसरपंच सामाजिक कार्यकर्ते पोलीस प्रशासन ,आरोग्य विभाग, पत्रकार, गावातील नागरिक व पंचक्रोशीतील कुस्तीप्रेमी इत्यादी उपस्थित होते

## थोडक्यात

### धावत्या ट्रेनमधून विद्यार्थिनीला खाली फेकले

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** पनवेल-सीएसएमटी ट्रेनच्या महिलांच्या डब्यात प्रवेश करुन एका १८ वर्षांच्या महाविद्यालयीन विद्यार्थिनीला धावत्या ट्रेनमधून खाली ढकलल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. श्वेता महाडिक असे या विद्यार्थिनीचे नाव आहे. गंभीर जखमी झालेल्या श्वेताच्या जबानीनंतर रेल्वे पोलिसांनी शेख अख्तर नवाज नावाच्या आरोपीला अटक केली आहे.श्वेता तिच्या मैत्रीणीसह खारघर येथील महाविद्यालयात जाण्यासाठी निघाली होती. दोघींनी पनवेल स्थानकावर पनवेल-सीएसएमटी लोकल पकडली. दोघीही लोकलच्या महिलांच्या डब्यात चढल्या. त्याचवेळी आरोपी शेखही महिलांच्या डब्यात शिरला. तेव्हा इतर महिलांनी त्याला डब्यातून खाली उतरण्यास सांगितले असता चिडलेल्या शेखने डब्याच्या दरवाजाजवळ उभ्या असलेल्या श्वेताला धावत्या ट्रेनमधून खाली ढकलले. श्वेता ट्रेनमधून खाली पडताच महिला प्रवाशांनी तात्काळ ट्रेनची चेन खेचून रेल्वे हेल्पलाइन क्रमांकावर माहिती दिली.

### सोनसाखळी चोरी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** खारघरमध्ये चालत जाणाऱ्या एका महिलेची सोनसाखळी चोरांनी हिसकावल्याची घटना घडली. खारघर सेक्टर २१ येथील फडके उद्यानाशेजारी आइस्क्रीम खरेदी करून ५९ वर्षीय महिला घरी जात असताना मागून आलेल्या दुचाकीस्वारांनी त्यांच्या गळ्यातून सोनसाखळी खेचली. शिल्पचौकासमोरील मार्गाने धूम ठोकून पळून गेले. या घटनेबाबत महिलेने खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

### रिक्षाच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** रिक्षाने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात सम्यक वानखेडे हा तरुण जखमी झाला. अपघाताप्रकरणी रिक्षाचालकाविरोधात खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.शशिकला वानखेडे या मानखुर्द पोलिस ठाण्यात शिपाई म्हणून कार्यरत आहेत. त्यांचा मुलगा सम्यक स्कूटीने पापडीचा पाडा बसथांब्याकडे जात असताना रिक्षाने अचानक यू टर्न घेतला आणि स्कूटीला धडक दिली. अपघातात महिला पोलिस शशिकला वानखेडे आणि सम्यक दोघेही खाली पडले. यात सम्यक जखमी झाला. त्यानंतर रिक्षाचालकाने धक्काबुक्की करून पळ काढला. अपघातात दुचाकीचेही नुकसान झाले.

### डॉक्टरविरोधात बलात्काराचा गुन्हा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** कळंबोलीत एका ५९ वर्षीय डॉक्टरने एका महिलेला लग्नाच्या भूलथापा देऊन गेल्या सात वर्षांपासून लैंगिक अत्याचार करत तिला लग्नास नकार देऊन मारहाण केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. कळंबोली पोलिसांनी पीडित महिलेच्या तक्रारीवरून आरोपी डॉक्टरविरोधात गुन्हा दाखल केला आहे. आरोपी डॉक्टर नेरूळ येथे राहण्यास असून त्याचा कळंबोली परिसरात दवाखाना आहे, तर ४९ वर्षीय पीडित महिला त्याच भागात राहण्यास असून दोघेही विवाहित असून त्यांना मोठी मुले आहेत. डॉक्टरने पहिल्या पत्नीपासून घटस्फोट घेऊन पीडित महिलेसोबत विवाह करण्याचे आश्वासन दिले होते; मात्र डॉक्टरने तिला नकार देऊन मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.




**रायगड जिल्ह्यातील पनवेल येथील प्रशिक एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक मोहन गायकवाड सर यांची रायगड पब्लिक स्कूलच्या १९ व्या वर्धापन दिनास प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार सय्यद अकबर आदी मान्यवर उपस्थित होते.**

**(दैनिक युवक आधार )**

# सन्माननीय मतदारांनो वेळीच जागे व्हा....!

सद्य परिस्थितीत भारत देशाचे स्वातंत्र्य, संविधान तसेच लोकशाही विषेष रूपाने पंगु होत असुन धोक्यात आलेली दिसुन येते. वर्तमान राज्य आणि केंद्र सरकार आणि काही तुटपुंजे, मोजके धनदांडगे उद्योगघराणे यांची अभद्रपणा, देशविघायक युती झालेली आहे. देशाच्या संवैधानिक स्वायत्त संस्था, आर्थिक संस्था, निवडणूक आयोग, सेबी, ईडी, सीबीआय यासारख्या तपास यंत्रणा, न्यायव्यवस्था/न्यायपालिका, प्रसार माध्यमे, मिडीया, राज्यपाल यासारख्या संवैधानिक पदांचा दूरदृष्टी ठेऊन दुरुपयोग केला जात आहे. देशाची लोकशाही/अर्थ व्यवस्थेला सर्व बाजूने उलटवून जखडून सगळयांना सभ्रमनात टाकले आहे असे निर्दषनास येते. परिणामतः कमकुवत सामान्य लोकांना तसेच कमजोर व गरीब लोकांचे जीवन वर्तमान परिस्थितीत उद्ध्वस्त होत असल्याचे सर्वांना जाणवत आहे.

किंबहुना, सर्वच स्तरावरील समाज घटकांचे, विशेषतः रूपाने अनुसूचित जाती/जमाती, विमुक्त जाती-भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग इत्यादी विविधांगी बहुजन समाज आणि अल्पसंख्याक समाज, प्रामुख्याने शेतकरी वर्ग, शेतमजूर, छोटे उद्योजक, व्यापारी यांचे सर्व बाजुने हितशत्रू आहेत असे म्हणणे यानिमित्याने स्वाभाविक वाटते. आपण सर्वांनी पक्के ओळखावे आणि आपल्या समाज बांधवांना त्यांच्या खऱ्या शत्रूची ओळख पटवून देणे आजच्या परिस्थितीला मारक ठरेल असे मला वाटते. जेणेकरून आपणच आगामी निवडणुकीमध्ये सतर्कता बाळगावी असे म्हणणे रास्त ठरावे.

देशाच्या सर्वसामान्य लोकांचे जीवन सुखी, समाधानी आणि समृद्धीने जगण्याचे स्वातंत्र्य दिवसेंदिवस हरण होत असल्याचे जाणवत आहे. भविष्यातील स्वप्ने कधीच पूर्ण होणार नाही षिवाय आपण अविकसीत राहू याकडे वर्तमान सरकारचे लक्ष आहे. याउलट आर्थिक रूपाने देशातील जनता, शासकीय संस्था आणि सरकारकडून कशी लाचार, हताश, कर्जबाजारी आणि कंगाल होतील अशीच ध्येय धोरणे आणि चुकीचे निर्णय घेतल्या जात आहेत. याचे सर्वसामान्य लोकांनी भान ठेवावे. देशाच्या सार्वजनिक आर्थिक संस्था, रिझर्व बॅंक, इतर बॅंका, जनतेची मालमत्ता मोजक्या रक्कमेत आपल्या लाडक्या तसेच जवळच्या नातेवाईक/व्यवसायीक/ धन्नाशेठांच्या घशात घातल्या जात आहे याचे भान असणे गरजेचे आहे असे दिसुन येते. त्यांचे लाखो करोडो रुपयांचे कर्ज माफ केले जात आहे. त्यामुळे देश कर्जबाजारीच्या डोहात दिवसेंदिवस बुडत चाललेला दिसुन येते. देशाची वाटचाल अराजकताकडे, अधोगतीकडे व हुकूमशाहीकडे जाणीवपूर्वक नेल्या जात आहे. देषाला कंगाल बनविण्याचे षडयंत्र वर्तमान परिस्थितीत देशाच्या सरकारकडून दिवसेंदिवस केले जात आहे. ही अभद्र परिस्थिती/युती आजमितीला देशापुढील सर्वात मोठे आव्हान/ संकट आहे. याचा विचार सर्व जनतेला आताच्या घडीला करणे महत्वाचे नाही काय. सध्याची युती मोडीस काढून त्यांना आगामी दिवसात सत्तेपासून बेदखल/नंगे करून लोकशाहीचे मूल्य आणि महत्व व विकास, व्यवस्था पुन्हा पुनर्जीवित होईल असे महान कार्य आपल्या हाताने होणे भविष्यासाठी अत्यंत काळजीपुर्वक करणे गरजेचे/ महत्वाचे आहे हा विचार प्रत्येक सामान्य जनतेला भारतीय लोकषाही/ अर्थव्यवस्था पंगू होणार नाही याची सर्कतता येत्या दिवसात घेणे अत्यावष्यक ठरते आहे. यासमवेत वर्तमान सरकार भारतीय संविधानाला कलंक लावुन बळजबरीने उपडून व फेकण्याचे कार्य भविष्यात घडणार असल्याचे चिन्ह आपल्याला आजच दिसुन येत आहे याचे भान आपण ठेवावे. असे मी कर्तव्यदृष्टीने सांगत आहे.

अर्थातच गेल्या निवडणुकीमध्ये सत्तेचा दुरुपयोग करून निवडणूक आयोगाला हाताशी धरून निवडणूक प्रक्रियेमध्ये जबरदस्तीपणे घोटाळे, धोकेबाजी आणि लबाडी करून सत्ता काबीज केली आहे असे पुरावे आपल्या देषात निवडणुकीच्या सेंटरमध्ये तसेच संबंधित जिल्हाधिकारीकडे दस्तावेज रूपाने उपलब्ध आहेत, आपल्याला संबंधित जिल्हाधिकारीकडून आरटीआय माध्यमाने सर्व संबंधीत पेपर मिळु शकते असे सरकारी नियमात आहे. कुण्या जेष्ठ नागरिकाची इच्छा असल्यास स्वरूपाने जबाबदारीने याबाबत माहिती मिळविण्यासाठी प्रयत्न करू शकतो.

आता काही दिवसात होऊ घातलेल्या महाराष्ट्र महानगर पालीका/ इतर किरकोळ तसेच इतर राज्यातील निवडणुकीचा शंख वाजला आहे. त्यामुळे त्यातही अशीच लबाडी, घपलेबाजी करून, खोटी आश्वासने, प्रलोभने आणि भूलथापा देऊन जनतेची दिशाभूल करून, सत्ता हस्तगत/काबीज करण्यासाठी ही युती सरकार प्रयत्नशील राहील. त्यामुळे महाराष्ट्राच्या व इतर राज्याचा सरकारी तिजोरीवर घाला घालण्यासाठी डोळा असल्याचे जाणवते आहे. अर्थातच लाडकी बहीण योजना उपक्रम सारखे पोकळ आणि फसव्या योजना जनतेला भुरळ घालण्यासाठी, निवडणूकीत मने वळविण्यासाठी व मते मिळविण्यासाठी कसेही करून सत्ता प्राप्तीसाठी पुढे करीत असल्याचे प्रयत्न करीत आहेत. यासाठी आपण सर्वांनी अतिशय दक्ष, सावध आणि जागरूक राहणे गरजेचे आहे. केंद्रातील आणि महाराष्ट्रातील तिकडमबाज अविष्वासी सत्ताधारी अतिशय धुर्त, कावेबाज, लबाड आणि चाणक्यनिती व देषद्रोही, धनदांडगे आहेत. सत्ता प्राप्तीसाठी ते कोणत्याही स्थराला जाऊ शकतात व सामान्य लोकांची बदनामी करायला यांची जीभ चराचरा चालत असते याचे भान ठेवणे आपल्या सर्वांसाठी महत्वाचे आहे. हे आपल्याला मी जाणीवपुर्वक सर्कततेने सांगत आहोत. पण वर्तमानात जो नेता / लोकप्रतिनिधी लोकांचे भले करणार नाही त्यांचे भविष्यात कधीही भले होणार नाही हे मी अनुभवाने सांगत आहो. माणूस, माणसाला माणुस प्रमाणे जगविणे महत्वाचे वाटते अन्यथा त्रास दिलेल्या लोकांना भविष्यात लोकच पडण्याचा सत्तेवरून बेदखल करण्याचा मार्ग दाखवल्याषिवाय राहणार नाही हे मात्र खरे.आपल्याच 90ः समाज बांधवांपैकी काही संधीसाधू, स्वार्थी किंवा जेल जाण्याच्या धाकाने मजबूर नेत्यांना, व्यक्तींना, कमजोर राजकीय पक्षांना आपल्या नादी लावून त्यांना वेगवेगळे राजकीय पक्ष, आघाड्या स्थापन करण्यासाठी प्रलोभन देऊन त्यांना आपसामध्ये फुट पाडून व जातीजाती मध्ये भांडणे लावुन देषहिताची बतावणी मतासाठी केली जात आहे. यासाठी सामान्य जनतेने देषाचे अमुल्य संविधान वाचविणे गरजेचे आहे. षिवाय पंगु होत असलेली अर्थव्यवस्थेचा विकास झाला पाहीजे या दृष्टीने आपण चांगल्या पक्षाला निवडुण देणे सर्वसामान्य जनतेचा विचार करणे महाराष्ट्र व देष हितार्थ होईल. अन्यथा आपण अजुनही गरीबीच्या पाईप मध्ये गेल्याषिवाय व दफन केल्याषिवाय आपल्याला मार्ग उरणार नाही याचे जनतेने भान ठेवावे कारण सामान्य जनतेला विविध स्वायस्त संस्थेकडून न्यायपालीकेकडून विनाकारण त्रास दिल्या जात आहे परिणामतः आपली आर्थिक बाजु घट्ट न होता विकास न होता. दारिद्रय रेषेच्या माध्यमाने आपल्याला जाणीवपुर्वक नेत आहे. आपल्याला आपले स्वातंत्र्य प्रचंड संघर्ष करून मिळवुन दिले त्यांना मी सन्मानाने वंदन करतो. या निमित्याने सर्वसामान्य जनतेच्या मतांची विभागणी करून आपले उमेदवार खात्रीपूर्वक निवडून आणण्यासाठी राज्य व केंद्र सरकार व त्यांचे संबंधित शेजारी पक्ष काहीतरी नविन युक्त्या, कारस्थाने करीत आहे, हे मनात ठेवणे व त्यावर वेळीच योग्य उपचार तसेच सतर्कता बाळगणे आता तरी गरजेचे आहे.

आपल्याला महाराष्ट्राचा व विदर्भाचा खऱ्या अर्थाने विकास साधावयाचा असेल तर भंडारा, गडचिरोली यांच्या मधात गोसीखुर्द प्रकल्पच्या आजुबाजुला सर्वांगीण विकासासाठी नाणार रिफायनरी प्रकल्प/वेगळा विदर्भ उभारण्यासाठी आपल्याला सर्व बाजुने उपाय करणे गरजेचे आहे. तरच आपल्या आजुबाजुचा विकास होवुन आपली प्रगती होईल. तसेच सरकारकडून कोणत्याही प्रकारचे प्रलोभनाला कोणतीही व्यक्ती बळी पडू नये कारण सध्याचे सरकार आभासी असुन काही न प्रगतीचा डांगोरा पिटण्यात पटाईत आहे. षिवाय जेष्ठ नागरीकांचे पेंषनचे कार्य 10-15 वर्षापासुन प्रलंबित आहे. सरकारकडे पैसा असुन सुध्दा अन्य उपक्रमाला पैसा कोठुन येतो असा प्रष्न जनतेला पडत आहे पण जे जेष्ठ नागरीक मरणाअवस्थेत आहे त्यांना वाढीव पेंषन न देणे हा सर्वस्वी त्यांच्यावर अन्यायकारक आहे. सर्वोच्च न्यायालयाचे आदेष दि. 04/12/2022 असुन सुध्दा यावर अमलबजावणी न होणे याला काय म्हणावे. या जेष्ठ नागरीकच्या भरोष्यावर आपण सत्तेत आहात त्यांचा शाप कदापीही घेवु नका? अन्यथा आपल्याला कधीही पायउतार व्हावे लागेल, याचे भान ठेवावे. असे निसर्गाच्या रूपाने खरे ठरलेले आहे.

सध्याची राज्य व केंद्र सरकार खोटारडे पणा, दुटप्पी धोरण, लबाडी, धूर्तपणा, क्लुप्त्या आणि कारस्थाने शोधून युट्यूब वर माहिती देणारे भरपूर न्युज चॅनल्स, प्रसार यंत्रणा आहेत. त्या आवर्जून पहा म्हणजे सत्य असत्य वेळीच समजेल. त्यावरील माहिती आपण व्यक्तिगत किंवा संघटित होऊन यथाशक्ती वेळ काढून आपल्या नातेवाईकांना, मित्र परिवाराला पाठवावी या समवेत शक्य असल्यास माहितीपर दोन-तीन मिनिटाचे व्हिडिओ तयार करून आपल्या संबंधित लोकांना पाठविणे. येणाऱ्या निवडणुकीमध्ये मोठया संख्येने भाग घेवुन संविधानाला व भारतीय लोकषाहीला कलंक न लागता पूर्णतः रूपाने वाचविणे महत्वाचे आहे तरच देष महासत्याच्या दिषेने प्रवास करू शकतो असे झाल्यास देषामध्ये सर्वत्र आनंद निर्माण होवुन देष बळकटीकडे प्रस्थान करेल. अर्थातच सन्माननीय मतदारांना नम्र पुर्वक विनंती करीत आहो की, नेते सध्याच्या दिवसात इकडुन तिकडे बेडुकउडी मारून बाहेरील पक्षातील आत मध्ये येण्यासाठी प्रयत्न करीत आहे. या लबाळांना वेळीच धडा षिकविण्यासाठी योग्य पक्षाला आपले अमुल्य मते देवुन स्वतः चा सर्वांगिण विकास करण्यासाठी सर्तकता बाळगणे महत्वाचे आहे. याचे मुल्य ओळखुन आपण चांगल्या विचारांचा लोकांना, नेत्यांना समोर आणणे व सर्वांगीण विकास होईल असे प्रयत्न करणे आपल्याच हाती आहे याचा गंभीर विचार वर्तमानात करणे महत्वाचे आहे.

**शब्दांकन: विजय सरस्वती**
**सिताराम सोनारघरे,**
**लेखक/वृत्तपत्र समिक्षक**
**''स्नेहविजय'' 24, उदयनगर,**
**गल्ली नं. 4, नागपूर-440024.**
**प्रबंधक (सामान्य/परिचालन)**
**भा.खा.नि. जिल्हा कार्यालय,**
**अजनी, नागपूर-15. (सेवानिवृत्त ऑगस्ट 2016)**

## तानाजी पिसे यांची सलग दुसऱ्यांदा बिनविरोध अध्यक्षपदी निवड

**दैनिक युवक आधार**

**कर्जत, मिरजगांव सतीश शिंदे :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मिरजगाव (मुले) येथील शालेय शिक्षण व्यवस्थापन समितीला दोन वर्ष पूर्ण झाले असता शाळेच्या व्यवस्थापन समितीचे पुनर्गठण करण्याची प्रक्रिया व नुतन समिती नेमणुक प्रक्रिया मंगळवार दि.16 डिसेंबर 2025 रोजी इयत्ता पहिली ते इयत्ता आठवी च्या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांच्या पालकांच्या उपस्थितीत पार पडली. एकूण 17 सदस्यीय समिती निर्माण करण्याचे मीटिंगमध्ये सर्वानुमते एकमत झाले. त्यामध्ये 50% महिला पालक प्रतिनिधी,एक दिव्यांग विद्यार्थी पालक प्रतिनिधी,एक दुर्बल व वंचित घटक पालक प्रतिनिधी (एस.टी) आणि यामध्ये मुख्याध्यापक हे कायमस्वरूपी सदस्य व इतर तीन राखीव सदस्य सोडता एक शिक्षण तज्ञ व बाकीच्या बारा सदस्यांमध्ये 50% महिला म्हणजे सहा पुरुष व सहा महिला अशी इच्छुक उमेदवारांमधून



नूतन शालेय शिक्षण व्यवस्थापन समिती निर्माण करण्यात आली.नंतर या निवडलेल्या बारा सदस्यांमधून अध्यक्षपदाची निवड करण्यात आली.अध्यक्ष पदासाठी एकमेव उमेदवार म्हणून श्री.तानाजी ज्ञानदेव पिसे उभे राहिले असता इतर 11 सदस्यांनी त्यांना बिनविरोध पाठिंबा देऊन अध्यक्षपदी निवड करण्यात आली व महिलांमधून सौ.प्रिय सुभाष गांगर्डे यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.ही निवडणूक शाळेचे मुख्याध्यापक श्री.नितीन काळे सर,श्री. शेख सर,श्री.कारंजकर सर यांच्या उपस्थितीत व निरीक्षणाखाली पार पडली.

## सुरक्षा जागरूकता सप्ताह 2025 अंतर्गत ONGC पनवेल येथे वाहतूक नियम जनजागृती कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** सुरक्षा जागरूकता सप्ताह 2025 निमित्ताने ONGC पनवेल येथे जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाच्या ठिकाणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. औदुंबर दिगंबर पाटील सर, पनवेल शहर वाहतूक शाखा, तसेच वाहतूक शाखेचे अंमलदार उपस्थित होते.

या वेळी केंद्रीय विद्यालय, ओएनजीसी येथील विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षकवर्ग, सुरक्षा रक्षक तसेच ONGC चे अधिकारी व कर्मचारी यांना वाहतूक नियमांबाबत पीपीटी च्या माध्यमातून सविस्तर माहिती देण्यात आली. कार्यक्रमादरम्यान श्री औदुंबर पाटील साहेब यांनी स्वतः प्रोजेक्टर च्या साह्याने स्क्रीनवर प्रात्यक्षिक स्लाईड्सच्या माध्यमातून हेल्मेट वापर, सीट बेल्ट, झेब्रा क्रॉसिंग, वेग मर्यादा, मोबाईल वापर टाळणे, तसेच अपघात टाळण्यासाठी घ्यावयाच्या खबरदाऱ्या याबाबत





मार्गदर्शन करण्यात आले.वाहतूक नियमांचे पालन केल्यास अपघातांचे प्रमाण कमी होऊन मानवी जीविताचे संरक्षण होऊ शकते, असे मार्गदर्शन यावेळी उपस्थितांना करण्यात आले. उपस्थित विद्यार्थी व नागरिकांनी सदर कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.सदर कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांसह सर्व उपस्थितांमध्ये वाहतूक सुरक्षिततेबाबत जनजागृती निर्माण झाली असून, वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याचा संदेश देण्यात आला.

## लाखांदूर तालुक्यातील पुयार येथे तथागत गौतम बुद्ध व व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण 29 डिसेंबरला

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे** : शांतिदूत स्मारक समिती व बौद्ध समाज भुयार तालुका लाखांदूर च्या वतीने तथागत गौतम बुद्ध व बोधिसत्व, भारतरत्न ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण 29 डिसेंबर 2025 ला आयोजित करण्यात आलेला आहे. सकाळी 11 वाजता भव्य धम्म मिरवणूक व 11.30 वाजता ध्वजारोहण पुतळ्याचे अनावरण व

धम्मदेशना कार्यक्रम होईल. यावेळी भदंत संघरत्न मानके ,पूज्य भदंत धम्म शिखर, पूज्य भदंत नागसेन महाथेरो यांच्या उपस्थितीत कार्यक्रम होईल. व दुसऱ्या सत्रात दुपारी 2 वाजता प्राध्यापक अनिल काणेकर , आमदार नानाभाऊ




पटोले ,प्रा. डॉ .युवराज मेश्राम यांचे मार्गदर्शन होईल. व रात्री 9 वाजता सप्त खंजेरी वादक सत्यपाल महाराज यांचे समाज प्रबोधन जाहीर कीर्तन होईल. करिता कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन शांतिदूत स्मारक समिती व बौद्ध समाज व समस्त गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आलेले आहे.

## पनवेल महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपविरोधात मजबूत आव्हान उभे करण्यासाठी महाविकास आघाडी सज्ज

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** पनवेल महापालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीतील अंतर्गत घडामोडींना वेग आला असून, विखुरलेली मते एकत्र आणत भाजपविरोधात मजबूत आव्हान उभे करण्याचे प्रयत्न अंतिम टप्प्यात आले आहेत. शेकाप महाविकास आघाडीतील काही माजी नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर निर्माण झालेल्या राजकीय पोकळीची जाणीव ठेवत उरलेल्या घटक पक्षांना एकत्र बांधून सामूहिक रणनीती आखण्यावर आघाडीतील नेत्यांचा भर आहे.

पनवेल येथील मार्केट यार्ड कार्यालयात झालेल्या उमेदवारी वाटपाबाबतच्या महत्त्वाच्या बैठकीत सर्वांना सोबत घेऊनच निवडणूक लढवायची अशी भूमिका स्पष्ट करण्यात आली. शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील यांनी या वेळी एकसंघपणे ध्यान दिव्या केला असला तरी कोणत्या पक्षाला किती जागा देण्यात येणार याचे अंतिम सूत्र अद्याप ठरलेले नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. काही प्रभागांत बोलणी पूर्ण झाली असली तरी अनेक प्रभागात अजूनही बोलणी सुरू असल्याचे महाविकास आघाडीच्या नेत्यांनी स्पष्ट केले. मागील विधानसभा निवडणुकीत शिवसेना (ठाकरे गट) महाविकास आघाडीतून वेगळी लढल्यामुळे पनवेलमध्ये विरोधकांना फटका बसला होता. त्या अनुभवातून धडा घेत या वेळी शिवसेना ठाकरे गटासह खारघर फोरमसारख्या स्थानिक प्रभावी घटकांना सोबत घेण्याची तयारी महाविकास आघाडीने दर्शविली आहे. त्यामुळे आघाडीच्या बैठकींना खारघर फोरमच्या अध्यक्षा व माजी नगरसेविका लीना गरड यांची उपस्थिती लक्षणीय ठरत आहे. मागील वर्षी निवडणुकीतील आकडेवारीनुसार भाजपचे आमदार प्रशांत ठाकूर यांना १,८२,८१८ मते, मिळून ते विजयी झाले. तर बाळाराम पाटील यांना १,३२,२३५ आणि लीना गरड यांना ४३,५०४ मते मिळाली होती. या मत समिकरणामुळे जागावाटपात गरड आणि ठाकरे गटाचे महत्त्व वाढल्याची चर्चा आहे. दरम्यान, मनसेची महाविकास आघाडीसोबत प्राथमिक वाटाघाटी सुरू असल्याने प्रत्येक प्रभागात भाजप उमेदवारांची कोंडी करण्यासाठी एकच विरोधी उमेदवार देण्याची रणनीती आखली जात आहे.

या बैठकीस शिवसेनेचे उपनेते बबनदादा पाटील,शेकापचे मा आमदार बाळाराम पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत, शेकापचे काशिनाथ पाटील, राष्ट्रवादी (शरद पवार गट) सतीश पाटील, समाजवादी पक्षाचे अनिल नाईक, शेकापचे प्रकाश म्हात्रे, मनसेचे प्रवक्ते योगेश चिले, खारघर फोरमचे पदाधिकारी उपस्थित होते.

# प्राचीन ज्ञान-परंपरेची आधुनिक तंत्रज्ञानाशी सांगड घालत भारताची ‘विश्वगुरू’ होण्याची क्षमता – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, प्रतिनिधी :**

प्राचीन भारत हा जगातील सर्वाधिक प्रगत आणि आर्थिक महासत्ता असणारा देश होता. भारतातील ज्ञान, परंपरा आणि संस्कृतीमुळे देश जगात आघाडीवर होता. या प्राचीन ज्ञानाची आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाशी प्रभावी सांगड घातल्यास भारत पुन्हा एकदा ‘विश्वगुरू’ होऊ शकतो, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

वांद्रे-कुर्ला संकुलातील ग्रँड हयात येथे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.यावेळी व्यासपीठावर के पी ग्लोबलचे अध्यक्ष राजेश शर्मा, वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे संस्थापक अध्यक्ष स्वामी विद्यानंद, जे एस डब्ल्यू ग्रूपचे अध्यक्ष सज्जन जिंदाल आयटी मंत्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक शैलेश त्रिवेदी उपस्थित होते.

‘इनव्हेशन, सेल्फ रिलायन्स अँड प्रोस्पेरिटी’ (शोध, स्वावलंबन आणि समृद्धी) या देशाच्या विकासदिशा ठरविणाऱ्या संकल्पनेवर या मंचावर मंथन होत असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, हिंदू ही केवळ धर्मव्यवस्था नसून जीवनपद्धती व विचारप्रणाली आहे. हजारो वर्षांपासून ही परंपरा जिवंत आहे. अनेक प्राचीन संस्कृती लुप्त झाल्या; मात्र सिंधू–हिंदू संस्कृती आजही टिकून आहे. पुराव्यांवर सिद्ध झालेले हे सांस्कृतिक सातत्य दहा हजार वर्षांपूर्वीपासून अस्तित्वात असल्याचे दर्शवते. भारत हा नवनिर्मितीचा मूळ स्रोत आहे. खगोलशास्त्र व भूगोलासारखी शास्त्रे प्राचीन काळात भारतात अत्यंत प्रगत होती. वेद आणि वेदपूर्व साहित्यामध्ये त्याची साक्ष आढळते. जगात आता पाचवी औद्योगिक क्रांती सुरू असून ही क्रांती डिजिटायजेशनमुळे होत आहे. तसेच एआय आणि डाटा या क्षेत्राला या क्रांतीमध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. यासाठी लागणारे उत्पादन महत्त्वाचे आहे. उत्पादन क्षेत्र हे अर्थव्यवस्थेचे कणा आहे. इनोव्हेशनचे मूळ उत्पादनातच आहे आणि या क्रांतीचे नेतृत्व करण्याची क्षमता भारताकडे आहे.




कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि डेटा क्षेत्रात भारत आघाडीवर असून २०३० पर्यंत जगातील सर्वाधिक डेव्हलपर्स भारतीय असतील, असे मायक्रोसॉफ्टचे प्रमुख सत्य नाडेला यांनीही नमूद केल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. एआयमुळे उद्योगांमध्ये आमूलाग्र बदल होत असून या इनोव्हेशनमध्ये नेतृत्व करण्याची क्षमता भारतात आहे.

‘आत्मनिर्भर भारत’ या प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या संकल्पनेचा उल्लेख करत मुख्यमंत्री म्हणाले की, १४० कोटी लोकसंख्येचा देश आत्मनिर्भर बनणे अत्यावश्यक आहे. स्वदेशी म्हणजे देशातच उत्पादन, भारतीय कंपन्यांमार्फत तंत्रज्ञानाचा विकास करण्यात येत आहे. चीनने जपानचे तंत्रज्ञान वापरले, त्याचे रिव्हर्स इंजिनिअरिंग केले. पण भारतात तंत्रज्ञान समजून घेऊन आत्मनिर्भर होण्याची क्षमता आहे. तंत्रज्ञानाला आज असलेले महत्त्व ओळखून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अनेक क्षेत्रात तंत्रज्ञान हस्तांतरणाची अट घातली आहे.

श्री.फडणवीस म्हणाले, जगाचा चीनवरील विश्वास त्यांच्या विस्तारवादी धोरणांमुळे कमी झाला असताना भारताच्या नेतृत्वावर आणि संस्कृतीवर जागतिक विश्वास वाढत आहे. आफ्रिकेमध्ये विकासाच्या नव्या संधी असून, त्या संधींमध्ये जो देश सक्रिय सहभाग घेईल तोच जागतिक नेतृत्व करेल. भारत आणि आफ्रिकी देशांमधील संबंध दृढ असून अनेक आफ्रिकी देश प्रधानमंत्री नरेंद्र मोदींना आपला नेता मानतात.

मुंबईत लवकरच ५४ आफ्रिकी देशांना होस्ट करणारी एक भव्य इमारत उभारली जाणार आहे. उद्योजकांनी आफ्रिकेकडे लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. आफ्रिकेत नैसर्गिक साधनसंपत्ती प्रचंड असून नव्या तंत्रज्ञानासाठी आवश्यक कच्चा माल उपलब्ध आहे. आफ्रिकेत उत्पादन सुरू झाल्यास जागतिक अर्थव्यवस्थेत आमूलाग्र बदल होईल आणि त्याचे नेतृत्व भारत करेल, असेही श्री. फडणवीस म्हणाले.

पापुआ न्यू गिनीच्या शिष्टमंडळाने गॅस उत्खननासाठी भारताला निमंत्रण दिल्याचा उल्लेख करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ही सर्व संधी भारताच्या प्राचीन परंपरेतून आलेल्या जागतिक विचारांचे फलित आहे. विचारांच्या बळावर जग जिंकण्याची ही परंपरा आहे.

हे सर्व जोडण्याचे काम वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमसारखे मंच करू शकतात. जागतिक व्यापारात २० टक्के वाटा मिळवण्याचे स्वप्नही या व्यापक दृष्टिकोनातून साकार होऊ शकते. दरम्यान, श्री सिमेंटच्या बांगर ग्रुपने राज्यातील चंद्रपूर येथे २,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यासाठीचे ‘इंटेंट लेटर’ मुख्यमंत्री फडणवीस यांना मंचावर सादर केले. ही गुंतवणूक म्हणजे राज्याच्या विकासावर दाखवलेला विश्वास आहे.

स्वामी विद्यानंद म्हणाले की, या फोरमचा उद्देश देशाचा विकास हा आहे. देशातील प्रत्येक नागरिकाला आर्थिक सक्षम बनवणे म्हणजे खरा विकास आहे. यासाठी सर्वांनीच आर्थिक विकासात सहभागी होणे गरजेचे आहे.


श्री. शर्मा म्हणाले की, जागतिक अर्थव्यवस्थेत भारत नक्कीच निर्णायक भूमिकेत असणार आहे. भारतात नवसंकल्पन मोठ्यावर असून निर्मिती क्षेत्रातही भारत आघाडी घेत आहे.

श्री. जिंदाल म्हणाले की, महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक प्रगत राज्य आहे. डावोस येथील ३ लाख कोटींचे कंपनीचे सामंजस्य करार प्रत्यक्षात येत आहेत. त्याचे श्रेय मुख्यमंत्री फडणवीस यांना आहे. यावेळी देशभरातील विविध शहरातील उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'सनबर्न फेस्टिव्हल'मध्ये मद्यविक्रीच्या परवानगीचा फेरविचार करा, हायकोर्टाचे राज्य सरकारला निर्देश

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, प्रतिनिधी :**

'सनबर्न फेस्टिव्हल'मध्ये मद्य विक्रीस परवानगी देणाच्या निर्णयाचा राज्य सरकारनं फेरविचार करावा, असे निर्देश शुक्रवारी (१९ डिसेंबर) मुंबई उच्च न्यायालयानं दिले. "केवळ २०० पोलीस हजारो मद्यधुंद लोकांना कसे हाताळू शकतील?" असा सवाल उपस्थित करत राज्य सरकारच्या धोरणात्मक निर्णयावर शंका व्यक्त केली. यावेळी न्यायालयानं मद्य विक्रीला किंवा सनबर्न फेस्टिव्हलच्या आयोजनास कोणतीही स्थगिती न देत सुनावणी तहकूब केली.



मुंबईत पहिल्यांदाच होणाऱ्या 'सनबर्न फेस्टिव्हल'चं आयोजन १९ डिसेंबर ते २१ डिसेंबर २०२५ दरम्यान शिवडी येथील इन्फिनिटी बे, टिंबर पाँड प्लॉटजवळ अटल सेतूच्या खाली करण्यात आलं आहे. या म्युझिकल फेस्टिव्हलमध्ये मोठ्या प्रमाणावर दारू विक्री देखील केली जाणार आहे. यामुळे सुरक्षेबाबत चिंता व्यक्त करत मुंबईतील रहिवासी चिंतामणी सारंग यांनी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर शुक्रवारी मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर सुनावणी घेण्यात आली.

सुनावणी दरम्यान, मुंबई उच्च न्यायालयाने 'सनबर्न फेस्टिव्हल'मध्ये दारू विक्रीला परवानगी देण्याच्या महाराष्ट्र सरकारच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. राज्य सरकारतर्फे महाधिवक्ता डॉ. मिलिंद साठे यांनी हायकोर्टाला सांगितलं की, मुंबई पोलीसांच्या कार्यक्षमतानुसार अधिकाऱ्यांना कायदा आणि सुव्यवस्था राखणं शक्य होईल. त्यामुळे सर्व गोष्टींचा विचार करूनच परवानग्या देण्यात आल्या आहेत.

तथापि, हायकोर्टानं राज्य सरकारच्या या उत्तरावर समाधान व्यक्त केलं नाही. न्यायालयानं विचारलं की, "जर एखादी अनुचित घटना घडली, तर २०० पोलीस हजारो मद्यधुंद लोकांना कसं हाताळू शकतील?" आणि पुढे असंही म्हटलं की, "आपल्याला आधीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करायला हव्यात, केवळ उपचारात्मक उपाययोजना करून काम चालणार नाही." हायकोर्टानं हेही सूचित केलं की, "लोक दारू पिऊन मद्यधुंद अवस्थेत सार्वजनिक ठिकाणी खुलेआम फिरू लागले, तर कायदा आणि सुव्यवस्थेची हमी कोण देणार?"

सुनावणीच्या अखेरीस मुख्य न्यायमूर्तींनी स्पष्ट केलं की, "आम्ही याचिका प्रलंबित ठेवत आहोत. प्रशासनासाठी हीच संधी आहे. तुम्ही अशाप्रकारे थेट खुलेआम दारू विक्रीचे परवाने देऊ शकत नाही." तसेच, "एकाचवेळी ४०हजारांपेक्षा जास्त लोकांची गर्दी होणाऱ्या खुल्या जागेत दारू विक्रीचा परवाना देणं अयोग्य आहे," असं मत हायकोर्टानं नोंदवलं.

# ...तर मंगल कार्यालये, सभागृहे, लॉन्समध्ये विवाह बंद!; ना–हरकत प्रमाणपत्राची सक्ती

**दैनिक युवक आधार**
**पुणे , प्रतिनिधी :**

शहरातील मंगल कार्यालये, सभागृह आणि लॉन्सना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र बंधनकारक आहे. असे असूनही हे प्रमाणपत्र घेण्यास टाळाटाळ केली जात असल्याने प्रमाणपत्र न घेणाऱ्या २७२ आस्थापनांना मंडळाने नोटिसा बजावल्या. यानंतर आता महापालिकेने मंगल कार्यालये, सभागृहे आणि लॉन्सना नवीन परवाना अथवा परवाना नूतनीकरणासाठी मंडळाच्या ना-हरकत प्रमाणपत्राची सक्ती केली आहे.पुण्यातील मंगल कार्यालये, सभागृहे आणि लॉन्समध्ये होणाऱ्या विवाहांमुळे



ध्वनिप्रदूषणासह इतर प्रकारचे प्रदूषण मोठ्या प्रमाणात होत होते. याची दखल घेऊन राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला यावर कार्यवाही करण्याचे निर्देश २०१५ मध्ये दिले होते. मंडळाने या प्रकरणी समिती स्थापन करून मंगल कार्यालये, सभागृहे आणि लॉन्ससाठी नियमावली तयार केली. या नियमावलीनुसार त्यांना मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक केले. त्यानंतर मंडळाने महापालिकेकडून नोंदणीकृत मंगल कार्यालये, सभागृहे आणि लॉन्सची यादी मागविली. त्यावर महापालिकेने १२ मार्च २०२४ रोजी सर्व आस्थापनांची यादी दिली.मंडळाने १८१ आस्थापनांना कारवाई का करू नये, अशी विचारणा करणाऱ्या नोटिसा २८ मार्च २०२४ रोजी बजावल्या. त्यानंतर २५ एप्रिल २०२४ रोजी आणखी ९१ आस्थापनांना नोटिसा बजाविण्यात आल्या. शहरातील एकूण २७२ आस्थापनांना नोटिसा देण्यात आल्या असून, मंडळाच्या अधिकाऱ्यांनी त्यापैकी ६९ आस्थापनांना प्रत्यक्ष भेटी देऊन तपासणीही केली आहे.

# वणी कोळसा खाणीत वाघ मृतावस्थेत आढळला, शिकार की...

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ, प्रतिनिधी :**

वणी वेकोलीच्या नायगाव कोळसा खदानीनजीक शिव मंदिर परिसरात आज शनिवारी सकाळी वाघ मृतावस्थेत आढळला. वीज प्रवाहाच्या धक्क्याने वाघाचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या वाघाचे वय तीन ते चार वर्ष असल्याचे सांगण्यात येत आहे.

वणी क्षेत्रात वाघ मृतावस्थेत असल्याची माहिती कोळसा खाणीतील कामगारांनी आज सकाळी वन कर्मचाऱ्यांना दिली. माहिती मिळताच वणी वन विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच शिरपूर ठाण्याचे पोलीस कर्मचारी यांनी घटनास्थळ गाठले. वाघ ठार झालेल्या स्थळाची पाहणी करून पंचनामा केला. वाघाचा मृत्यू नेमका कशाने झाला याबाबत तर्क वितर्क लावले जात आहे. वीज प्रवाहाच्या धक्क्याने हा वाघ ठार झाल्याची शक्यता व्यक्त होत आहे. या संदर्भात



अधिक माहिती घेण्यासाठी डिएफओ यशवंत यांना विचारणा केली असता, वाघ मृतावस्थेत आढळल्यानंतर सर्वबाजूने तपास सुरू केल्याचे त्यांनी सांगितले.पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचे पथक वाघाचे शवविच्छेदन करत आहे. हा अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण कळेल, तोपर्यंत निश्चित माहिती देता येणार नाही असे ते म्हणाले. सायंकाळपर्यंत सर्व माहिती देवू असे त्यांनी सांगितले. या घटनेची माहिती सर्वत्र पसरताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती.

# औषधाच्या चिठ्ठीतील डॉक्टरांच्या हस्ताक्षरावर लक्ष ठेवणार; निरीक्षणासाठी उपसमिती स्थापन करण्याचे एनएमसीचे निर्देश

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, प्रतिनिधी :**

डॉक्टरांचे औषधाच्या चिठ्ठीमधील अक्षर सर्वसामान्यांच्या समजण्यापलिकडे असते. रुग्ण, नातेवाईक व फार्मासिस्ट यांचा बऱ्याचदा गोंधळ उडतो. त्यामुळे औषधाच्या चिठ्ठीतील डॉक्टरांच्या हस्ताक्षरावर देखरेख ठेवण्याचा निर्णय राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने घेतला आहे. औषधाच्या चिठ्ठीसंदर्भातील नियम, नियामक व नैतिक मानकांचे पालन आणि निरीक्षण करण्यासाठी देशातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयांना औषध व उपचार समिती (ड्रग्स अँड थेरप्युटिक्स कमिटी – डीटीसी) अंतर्गत स्वतंत्र उपसमिती स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाच्या २७ ऑगस्ट २०२५ च्या आदेशानुसार राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने देशातील सर्व वैद्यकीय महाविद्यालये, संस्थांच्या अभ्यासक्रमात औषधचिठ्ठी सुवाच्य आणि स्पष्ट हस्ताक्षरात असण्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे. तसेच औषधचिठ्ठी व वैद्यकीय दस्ताऐवजांची वाचनीयता हे भारतीय संविधानाच्या कलम २१ अंतर्गत आरोग्य हक्काचा एक आवश्यक घटक असल्याचे स्पष्ट केले आहे.

राष्ट्रीय वैद्यकीय आयोग कायदा, २०१९, भारतीय वैद्यकीय परिषद (व्यावसायिक आचरण, शिष्टाचार आणि नीतिमत्ता) नियम, २००२ आणि २१ सप्टेंबर २०१६ च्या अधिसूचनेतील तरतुदींचा संदर्भ दिला आहे. यामध्ये प्रत्येक वैद्यकीय व्यावसायिकाने औषधाची चिठ्ठी वाचनीय आणि शक्यतो मोठ्या अक्षरात लिहणे बंधनकारक आहे. वैद्यकीय कागदपत्रांमध्ये सुवाच्य आणि स्पष्टतेची आवश्यकता यावर भर देऊन वैद्यकीय आस्थापना (नोंदणी आणि नियमन) कायदा, २०१० आणि इलेक्ट्रॉनिक आरोग्य नोंदींवरील संबंधित नियमांचा संदर्भ न्यायालयाने दिला आहे.

न्यायलयाने दिलेल्या आदेशानुसार एनएमसीने सध्या देशात लागू असलेल्या नियमांनुसार सर्व वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये औषधाच्या चिठ्ठीच्या पद्धतींची अधिक सखोलपणे निरीक्षण करण्याची आवश्यकता नमूद केली. त्यानुसार प्रत्येक वैद्यकीय महाविद्यालयाने डीटीसीअंतर्गत उपसमिती स्थापन करून औषधाच्या चिठ्ठीचे प्रणालीबद्ध मूल्यमापन करणे, पद्धतींचा आढावा व विश्लेषण करणे आणि आवश्यक सुधारात्मक उपाय सुचवणे, या मूल्यमापनांचे निष्कर्ष डीटीसीच्या बैठकीच्या इतिवृत्तात नोंदविणे एनएमसीने बंधनकारक केले आहे. एनएमसीने या इतिवृत्तांताची मागणी केल्यास त्यांना या नोंदी उपलब्ध करणे बंधनकार असणार आहे. सर्व वैद्यकीय महाविद्यालये व संस्थांना उप-समिती तात्काळ स्थापन करण्याचे आणि देखरेख यंत्रणा विलंब न करता कार्यान्वित करण्याचे निर्देशही एनएमसीने दिले आहेत.


**कशी असावी औषधाची चिठ्ठी**

प्रत्येक डॉक्टरने औषधाची चिठ्ठी स्पष्टपणे आणि शक्यतो मोठ्या अक्षरात लिहून द्यावी. औषधांची जेनेरिक नावेही लिहून द्यावीत. तसेच औषधांचा तर्कसंगत वापर यावर औषधाच्या चिठ्ठीमध्ये भर द्यावा. अशा सूचनाही आयोगाने केल्या आहेत.

# महाराष्ट्राचे ‘कॅलिफोर्निया’ गोठले, निफाडमध्ये हंगामातील नीचांकी तापमानाची नोंद

**दैनिक युवक आधार**
**नाशिक, प्रतिनिधी :**

महाराष्ट्राचे ‘कॅलिफोर्निया’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या निफाड तालुक्यात शनिवारी कडाक्याची थंडी अनुभवण्यास मिळाली. येथे पारा ४.५ अंश सेल्सिअस या हंगामातील नवीन नीचांकी पातळीवर पोहोचला असून हे राज्यातील सर्वात कमी तापमान असण्याची शक्यता वर्तविली जात आहे. नाशिक शहरातही ६.९ अंश तापमानाची नोंद झाली. थंडीच्या तीव्र लाटेमुळे



जनजीवनावर परिणाम झाला आहे.

निफाड आणि नाशिक शहराच्या तापमानात साधारणतः दोन ते तीन अंशांचा फरक कायम असतो. शनिवारी नाशिकमध्ये पारा ६.९ अंशांपर्यंत खाली घसरला. जो या हंगामातील नीचांक ठरला. याआधी नाशिकमध्ये गेल्या शुक्रवारी ७.८ अंश तापमानाची नोंद झाली होती. सातत्याने घसरणाऱ्या या पाऱ्यामुळे जिल्ह्यात हुडहुडी भरली असून नागरिकांना दिवसाही उबदार कपड्यांचा आधार घ्यावा लागत आहे.

हिवाळ्यात नाशिक जिल्ह्यात निफाडचे तापमान सर्वात कमी राहण्यामागे अनेक भौगोलिक कारणे असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. बागायती प्रदेश आणि सिंचनाची मुबलक व्यवस्था यामुळे या भागात आर्द्रता अधिक असते. कुंदेवाडी येथील कृषी संशोधन केंद्राने दिलेल्या माहितीनुसार, निफाडची भौगोलिक रचना ही बशीसारखी आहे. या भागात डोंगर किंवा टेकड्या नसल्याने हा समतल परिसर आहे. उत्तर भारताकडून येणारे थंड वारे आणि जमिनीची जलधारण क्षमता यामुळे येथे थंड हवा साठून राहते. थंड हवा ही उष्ण हवेपेक्षा जड आणि दाट असल्याने ती वातावरणाच्या खालच्या थरात स्थिरावते. गोदावरी, कादवा, दारणा, विनता या नद्यांचा संगम आणि नांदूर मध्यमेश्वर जलाशयाचे अस्तित्व यामुळे या परिसरात नैसर्गिकरीत्या थंडीसाठी पोषक वातावरण निर्माण होते. ज्या भागात वनस्पती आणि बारमाही शेती अधिक असते, तिथे सूर्यप्रकाश थेट जमिनीपर्यंत पोहोचण्यास अडथळे येतात, परिणामी तापमान कमी राहते असे वरिष्ठ संशोधक सहायक डॉ. भरत मालुंजकर यांनी स्पष्ट केले.

**द्राक्ष बागांवर थंडीचे सावट**

कडाक्याच्या थंडीचा सर्वाधिक फटका शेती क्षेत्राला, विशेषतः द्राक्ष पिकाला बसण्याची शक्यता आहे. तापमान पाच, सहा अंशांच्या खाली गेल्याने द्राक्ष मण्यांच्या विकासाची प्रक्रिया मंदावते.

थंडीमुळे वेलींची अन्न साठवण्याची प्रक्रिया गोठते, ज्याचा थेट परिणाम मण्यांच्या आकारमानावर होतो. हवामानातील या बदलामुळे द्राक्षांवर ‘भुरी’ रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता निर्माण झाल्याने उत्पादक धास्तावले आहेत.